# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक किंमत १ रुपय

१९८४



जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक


: संपादक :

**श्री.क.हि.काकरे**

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

डॉ.श्री.दि.परचुरे
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

श्री.सदानंद चेंदवणकर
( मराठी आवृत्ती )


## श्रीसाई वाक्सुधा


वर्ष ६३ वे )        किंमत १ रुपया        ( अंक १

श्रीसाईलीला एप्रिल १९८४

वर्षारंभ व श्रीरामनवमी विशेषांक

दूरध्वनी ८८२२५६१

: कार्यालय :

" साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई-४०० ०१४.

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



# श्रीसाई वाक्सुधा

नाही मज दुसरा जप।
नाही मज दुसरे तप।
अवलोकीं एक सगुणरुप।
शुद्ध स्वरुप साईंचें। ७९ ॥
पाहतां श्री साईचें मुख।
हरुन जातसे तहानभूक।
काय तयापुढें इतर सुख।
पडे भवदुःख विस्मृति ॥ ८० ॥
पाहतां बाबांचे नयनांकडे।
आपआपणां विसर पडे।
आंतुनी येती जैं प्रेमाचे उभडे।
वृत्ति बुडे रसरंगीं ॥ ८१ ॥
कर्म धर्म शास्त्र। पुराण।
योगयाग अनुष्ठान।
तीर्थयात्रा तपा चरण।
मजएक चरण साईचे ॥ ८२ ॥
अखंड गुरु वाक्या नुवृत्ती।
दृढ धरितां चित्तवृत्ती।
श्रद्धेचिया अढळ स्थितीं।
स्थैर्य प्राप्ति निश्चळ ॥ ८३ ॥
— श्री साई सच्चरित अध्याय १ ला.

# सुविचार

सहसा विदधीन न क्रियाम्।
अविवेकः परमापदां पदम्।
वृणते हि विमृश्यकारिणं
गुणलब्धाः स्वयमेव सम्पदः ॥

अविचाराने कोणतेही काम करू नये. कारण अविचार हा संकटांचें मोठे कारण आहे. खरोखर विचार करून काम करणाऱ्या मनुष्याकडे गुणांवर लुब्ध होणारी संपत्ती (लक्ष्मी) आपण होऊन येते.

★

# अनुक्रमणिका एप्रिल १९८४


| | | |
|---|---|---|
| १) | संपादकीय | – श्री. बाबांशी एकरुप व्हा |
| २) | ओम भक्तानुग्रहकातरायनमः | – श्री. मु. ब. निंबाळकर |
| ३) | श्री रामचरित, मानसाचा महिमा | – सौ. कुसुमताई जोग |
| ४) | ईश्वर ही व्यक्ती नसून शक्ती आहे | – श्री. पां. शं. भुजबळ |
| ५) | देव भावाचा भुकेला | – सौ. उषाताई अधिकारी |
| ६) | नवविधा भक्ती | – श्री चंद्रकांत गरगटे |
| ७) | १२५ वर्षांचे साईभक्त – श्री रामबाबा | – श्री. गणपतराव सामंत |
| ८) | मशिदीतील पहिला रामजन्मोत्सव | – श्री. बाळकृष्ण देसाई |
| ९) | श्री दासकिसन बाबा | – श्री. गोपाल चंदीरामानी |
| १०) | जय जय रघुवीर समर्थ | – श्री. मधुसूदन करंबेळकर |
| ११) | श्री साईराम मीलन महायज्ञ | – डॉ. अनिल जायस्वाल |
| १२) | सुगंधी भेट | – सौ. शैलजा बुधकर |
| १३) | साई कृपेने समाधी दर्शन | – श्री. शिवदयाल अग्रवाल |
| १४) | गणूचा उद्धार | – श्री. कृ. भा. देशमुख |
| १५) | पितृतुल्य भ्राता माझा वनवासी झाला | – श्री. मधुकर अंबाडे |
| १६) | श्री साई दर्शन | – कु. सरल खारकर |
| १७) | श्रीसाईनाथ हॉस्पीटल | – कु. रेखा दिघे |
| १८) | शिरडी वृत्त | – जाने. ८४ |

# श्रीबाबांशी एकरूप व्हा

स. न. वि. वि.




व्रज भाषेत संत तुलसीदासांनी 'रामचरितमानस' हा अमृतमधुर ग्रंथ लिहिलेला असून तो आजही लक्षावधी रामभक्त रसिकांना उच्चतम आनंद देत आहे.

संत कवी तुलसींच्या रामायणातील दोहे इतके हृदयस्पर्शी झाले आहेत की विचारताच सोय नाहीं याचे कारण तुल्सीदासांचे वर्ण्य विषयाशी झालेले तादात्म्य हेच होय. प्रभु रामचंद्राशिवाय त्यांना अन्य विचार सुचतच नसे. प्रभु रामचंद्राचे ते तेजःपुंज रूप त्यांच्या दृष्टी समोर जागृतीत, स्वप्नात, विजनात सदैव उभे रहावयाचे! इतर देव देवता कितीही पूज्य असोत, त्यांचे स्मरण क्षणमात्रही तुल्सीदासांनी केले नाहीं. त्यांनी आपल्या आवडत्या रघुकुळ–टिळकावर उत्कृष्ट काव्य लिहिले आणि ते कशासाठी म्हणाल! कीर्तीसाठी? छे, अजिबात नव्हे. त्यांच्याच शब्दात सांगावयाचे झाल्यास

"स्वान्तः सुखाय तुल्सी रघुनाथ–गाथा–  
भाषा–निबंधमति मंजुल मा तनोति ।

असे सांगावे लागेल.

अशा या तुल्सीदासांच्या एकनिष्ठ रामभक्तीची परीक्षा पहाण्यासाठी त्यांच्या शिष्यांनी त्यांना एकदा मथुरेच्या कृष्ण मंदिरात फसवून नेले, तुलसीदास दुसऱ्या देव देवतांच्या दर्शनास कधी जात नसत हे त्या शिष्यांना माहित होते, व म्हणून त्यांनी स्वामींना खोटेच सांगितले की, "स्वामीजी हे राममंदिर आहे."

मंदिराचा दरवाजा उघडण्यात आला. पहातात तो पुढे मोरमुकुटधारी श्रीकृष्णाची मूर्ती! शिष्यांना वाटले आता स्वामीजी नाईलाजाने तरी श्रीकृष्णाला नमस्कार करतील पण तसे झाले नाहीं. तुलसीजी दृढ निश्चयाने म्हणाले, देवा, मोरमुकुटधारी कृष्ण कन्हैयाचे रूप आपण कां धारण केलेत?' बन्सी आपण कां

हाती धरलीत? तुमचे ते महान धनुष्य कोठे आहे? त्या धनुर्धारी तेजःपुंज रूपाचा मजला ध्यास लागलेला आहे. भगवन्

का बर नऊं छबि आजकी भले बिराजो नाथ ।
तुलसी मस्तक तब नमे धनुष्य बाण बिराजे हाथ ।"

(हाती धनुष्य बाण घेतलेली आपली नेहमीची मूर्ती दिसल्या शिवाय माझे मस्तक नत होणार नाही! )

अन् काय आश्चर्य! त्या एका कृष्णमूर्तीच्या ठिकाणी तुलसींना कोदंडधारी राममूर्ती दिसू लागली! मगच त्यांनी तिला भक्तिभावाने वंदन केले. थोडक्यात आशय असा की कोणत्याही वर्ण्य विषयाशी जितके तादात्म्य व्हावे तेव्हांच कुठ 'रामचरित मानसा'सारखी अमर कलाकृती निर्माण होते.

एकदा श्रीसमर्थ रामदास स्वामी कृष्णातटाकी असताना त्यांच्या पुढून यात्रेकरूंचे थवेच्या थवे चालले होते. "कुणीकडे चाललात?" समर्थांनी त्यांना विचारले, 'आषाढी एकादशीसाठी पंढरीस जात आहोत, चलावे आपणही आमचे बरोबर. आम्हांस खरोखरीच आनंद होईल, आपली संगत, सहवास लाभेल आम्ही स्वतःला धन्य धन्य समजू" असे यात्रेकरू म्हणाले; 'अहो आम्ही येऊन काय करणार? शरयुतीर निवासी श्रीरामा वाचून आम्हांस दुसरे कोणीच दिसत नाहीं.' हे उत्तर ऐकून यात्रेकरू आपापल्या मार्गाने निघून गेले.

श्री समर्थांची ही निष्ठा श्री पंढरीनाथाला ठाऊक होती. तथापी समर्थांना एकदा पंढरीला आणलेच पाहिजे असा विचार करून विठोबा वेष पालटून ब्राम्हणाचे रूप धारण करून श्री समर्थांना बोलावण्यास आले. समर्थांचे पानगे भाजण्याचे काम चाललेले होते. तेवढ्यात हा ब्राम्हण पातला. श्री समर्थांना अतिशय आनंद झाला ते ब्राम्हणास म्हणाले, "स्नान करावे, श्रीरामचंद्रजींचा प्रसाद तयार आहे." ब्राम्हणाने स्नान केले, संध्या केली, सूर्यास नमस्कार केला आणि समर्थांचे समवेत पानगे भरण केले", आपण कोठे असतां? आपले नाव काय?" म्हणून समर्थांनी ब्राम्हणास विचारले, "पंढरीस सहकुटुंब असतो, मला विठ्ठलभट असे म्हणतात. एकादशी जवळ आली. यजमान धुंडीत इकडे आलो. देवाचे भक्त तेच माझे यजमान आपणही भक्तच आहांत, चलावे मजबरोबर पंढरीला मी तुम्हांला सांभाळून नेईन' असे विठ्ठलभट नाव धारण केलेले साक्षात् पंढरीनाथ बोलले.

"शरयूतीर विहारी प्रभु रामचंद्रा वाचून मला अन्य कुणाचीही अपेक्षा नाही" असे समर्थांचे उत्तर ऐकताच विठ्ठलभट म्हणाले, "तेथे प्रत्यक्ष हनुमंत आहेत आणि राम आणि रामाचे दास हनुमंत काही भिन्न नव्हेत. तेव्हां आपण निदान हनुमंताचे तरी दर्शनास आले पाहिजे" समर्थांचे मन वळले आणि विठ्ठलभटाचे संगतीने ते पंढरीस जाण्यास तयार झाले. त्यांचे बरोबर दत्तु नापिक हा होताच. वाटेत चालता चालता पाऊस लागला. चिखलातून जावे लागले. पायात काटे मोडले. पण विठ्ठलभटाने ते स्वतः काढावे असे करता करता ते तिघेही पंढरीस महाद्वारापाशी येऊन पोचले. विठ्ठलभट घरी जाऊन येतो असे म्हणाले, आणि निसटले ते जागच्या जागी गुप्त झाले. दत्तु नापिक विचारतो, "स्वामीजी विठ्ठलभट नाहीसे कसे झाले हो?" "अरे, ते विठ्ठलभट कोठचे? ते स्वतःच पंढरीनाथ होते. आमचेवर त्यांचे हे केवढे ऋण!" श्री समर्थ म्हणाले.

श्री समर्थांनी हनुमंताचे दर्शन घेतले आणि रामच समजून श्री विठ्ठलाकडे पाहून विचारतात –

"येथे उभा कां श्रीरामा । मनमोहना मेघश्यामा ।।
चाप बाण काय केले । कर कटावरी ठेविले ।।
कां बा धरिला अबोला । दिसे वेष पालटला ।।
काय जाली अयोध्यापुरी । येथे वसविली पंढरी ।।
काय केली शरयु गंगा । येथे आणिली चंद्रभागा ।।
काय केले वानरदळ । येथे वसविले गोपाळ ।।
दिसे हनुमंत एकला । हा कां सैन्यातून फुटला ।।
काय केले सीताबाई । येथे राही रखुमाई ।।
रामदासी जैसा भाव । तैसा झाला पंढरी राव ।।"

विठ्ठलाने रामरूप धारण केले. जगाला आश्चर्य वाटले. सर्वांनी समर्थांना विनंती केली. स्थान महात्म टिकले पाहिजे. तेव्हां समर्थांनी पुन्हा प्रार्थना केली, व राम पुन्हा विठ्ठल झाले. श्री समर्थांना तेही रूप मानवले.

माझे मानस विठेवरी । विठ्ठलचरणी निरंतरी ।।१।।
जो जो पंढरीस गेला । तेणे कळीकाळ जिंकिला ।।२।।
रामदास म्हणे पंढरी । नाना साधनविणे तारी ।।३।।

तेव्हां या गोष्टीचे तात्पर्य इतकेच की,

जैसा भाव प्रयति बिंबला । तयाचाचि देव जाला ।
जो जैसे भजे त्याला । तैसाचि बोले ॥

असो – अशाच प्रकारचा एक प्रसंग श्रीधर कवींनी 'हरिविजय' ग्रंथात वर्णन केला आहे.

श्रीरामचंद्र प्रभूंनी अवतार कार्य संपवून आपला देह शरयु नदीत विसर्जन करताच भक्त हनुमंत श्रीराम स्मरण करीत दक्षिण सागरी राहू लागले. एके दिवशी नारदमुनी हनुमंतास भेटण्यास गेले. नारदास पाहून त्या रामभक्तास फार आनंद झाला. त्याने प्रेमाने त्यांचे स्वागत केले व त्यांना बसण्यासाठी तृणासन दिले. नारदांनी विचारले, "बा हनुमंता, कसा काय वेळ आता घालवतोस?"

हनुमंत म्हणाला, "प्रभुचिंतनात वेळ मी घालवितो."

त्यावर नारद म्हणाले "असे करण्यापेक्षा तीर्थयात्रा कर म्हणजे संतांच्या गाठीभेटी होतील आता श्रीकृष्णावतार चालू आहे. द्वारकेत जाऊन भगवंतांचे दर्शन घे.

भोळ्या मारुतीस ही सूचना पसंत पडली.त्याप्रमाणे तो तीर्थाटनास निघाला असे करता करता एके दिवशी तो द्वारकानगरी बाहेरील फलबागेत येऊन थडकला. स्वच्छंदाने विहार करून तो फळे खाऊ लागला. बागरक्षकांनी त्याला अडविले. त्यांना त्याने सळो की पळो करून सोडले. रक्षक भगवान श्रीकृष्णाकडे येऊन तक्रार करू लागले की, एक भला मोठा वांडगा हुप्या येऊन त्याने फळबागेची नासधूस चालविली आहे, आणि तो आम्हाला काही आटोपत नाही. भगवंतांनी अंतर्ज्ञानाने जाणले की हा भक्त मारुती–हनुमान असावा, व तो त्यांच्या दर्शनासाठी आला असावा. भगवंतालासुद्धा यादवांचा गर्वहरण करावयाचा होता.

श्रीकृष्णाने यादव सेनानींना त्याचा बंदोबस्त करण्यास पाठविले. सेनापतीने बागेत जाऊन तो हुप्या पाहिला. त्याचे रूप पाहून ते मनात अक्षरशः घाबरले. परंतु धैर्य आणून ते त्याला विचारतात, "अरे मर्कटा! ही बलरामाची बाग आहे. परवानगी शिवाय येथे फळे तोडणारा तू रे कोण?" हनुमंत त्यावर उत्तर करतो, "हा बलराम कोण? मी तर प्रभू रामचंद्रा शिवाय कुणालाच म्हणून ओळखत नाही." हे ऐकून यादवांना राग आला आणि ते त्याच्यावर चाल करून गेले. भक्त हनुमंताने जाग्यावर बसूनच आपल्या केवळ पुच्छाने त्या सर्वांना असे ताडन

केले की ते सर्व सैनिक भीतीने गर्भगळित झाले व त्यांची दाणादाण उडाली. गर्वरहित होऊन ते सारे श्रीकृष्णाकडे गेले आणि सांगू लागले, "तो माकड मोठा भयंकर आहे. आमचे त्याच्यापुढे काही चालू शकणार नाही." हे ऐकताच कृष्णाला हसू आले व तो म्हणाला, "जा, त्याला सांगा, श्रीकृष्ण तुला भेटीस बोलावत आहे." सैनिक परत गेले व लांबूनच त्यांनी हनुमंतास भगवंताचा निरोप कळविला. मारुती म्हणाला, "मी रामाशिवाय कुणालाच ओळखत नाही,

यादव परत श्रीकृष्णाकडे आले व हनुमंताचे बोलणे त्यांना सांगितले. भगवंताने त्यांना पुन्हा त्याचेकडे पाठविले व श्रीराम भेटीस बोलावित आहेत असा निरोप त्याला कळविण्यास सांगितले. श्रीरामप्रभूचे नाव ऐकताच तो राम भक्त शिरोमणि उल्हसित झाला व सैनिकांसमवेत जाण्यास तत्परतेने उठला.

इकडे राजमंदिरात आपला भक्त येणार म्हणून श्रीकृष्णांनी सत्यभामेस सीतामाई बनवून आपल्या शेजारी सिंहासनावर बसण्यासाठी तयार होण्यास सांगितले. सत्यभामा गोंधळली. सीता शालू कोणता नेसत असे, अलंकार कसे काय घालत असे याचाच विचार ती करू लागली.

इकडे मारुती राजद्वाराजवळ येऊन ठेपला. सत्यभामा तयार नाही तेव्हा कृष्ण स्वतः राम झाला, व रुक्मिणीलाच त्याने आपल्या बाजूला सीता म्हणून बसण्यास सांगितले आणि आपली आयुधे शंख, चक्र व गदा यांना अनुक्रमे लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न बनविले. अशा रितीने राम पंचायतनातल्या रामाचे दर्शन त्याने आपल्या लाडक्या भक्तास दिले. रामप्रभूस पाहताच त्या थोर भक्ताचे हृदय भक्तीने उचंबळून आले. त्याने साष्टांग नमस्कार-लोटांगण घातले अशा प्रकारे काही दिवस द्वारकेत राहून हनुमंत भगवंताचा निरोप घेऊन आनंदाने पुढील मार्गास लागला.

भगवान श्रीसाईनाथांनी सुद्धा आपल्या भक्तांच्या भक्तीची पराकाष्ठा पाहून त्यांना निरनिराळ्या स्वरूपात वेळोवेळी दर्शन दिले आहे. तेव्हा भक्तांनो, ज्याची तुम्ही भक्ती करता ती स्वार्थी भक्ती नसावी ती भक्ती संपूर्णपणे अंतःकरणपूर्वक असावी. त्या संताचे देवतेचे मनापासून स्मरण करावे. त्याचेशी अगदी एकरूप व्हावे म्हणजे तुमचे कल्याण झाल्याशिवाय रहाणार नाही.

☆ ★ ☆

# ॐ भक्तानुग्रहकातराय नमः

**********************

–ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त)
१–१४ फाईव्ह स्टार अपार्टमेंटस्,
बंड गार्डन रोड, पुणे – ४११ ००१

० वरील नाव "श्रीसाईबाबा-अष्टोत्तरशत नामावलिः" मध्ये अनुक्रमांक ४४ वर आलेले आहे. **'कातर'** याचा अर्थ भित्रा असा होतो व श्रीसाईबाबांच्या बाबतीत हा शब्द अगदी अयोग्य असल्याने वरील नावाचा श्रीसाईलीलेच्या सप्टेंबर १९८० च्या अंकात अनुवाद प्रसिद्ध करताना मला काय अर्थ लावावा हे समजेना. एक दोन संस्कृत पंडितांशी विचार विनिमय केला पण त्यांनाही दुसरा योग्य अर्थ सुचेना. बहुतेकांना आणि मलाही शंका आली की हा मुद्रण दोष असेल आणि तिथे **'कारक'** म्हणजे करणारा असा शब्द मुळांत असावा असे वाटले. त्याप्रमाणे माझ्या लेखात मी "**ॐ भक्तानुग्रहकारकाय नमः**" असे नाव शुद्ध करून लिहिले आणि "भक्तांवर अनुग्रह (कृपा) करणाऱ्या साईनाथांना नमस्कार असो" असा अनुवाद खाली दिला.

अलिकडे मी या नामावलीचे पुन्हा परीक्षण करू लागलो. अर्थातच या वरील नावावर आणखी मनन सुरू झाले. खरोखरीच हा मुद्रणदोष असेल का? आपण संस्कृत नावात केलेल्या बदलाला आधार काय? योगायोगाने ऑल इंडिया साई समाज मद्रास यांनी प्रसिद्ध केलेली कै. पूज्य नरसिंहस्वामींच्या या नामावलीची मूळ प्रत मला मिळाली. त्यात **'कातर'** हाच शब्द सापडला. तेव्हां याच शब्दाचा योग्य अर्थ बसविण्याचा प्रयत्न मी सुरू केला. संस्कृत शब्दकोशांमध्ये शोधाशोध केली त्यांत **'कातर'** याचा "अस्वस्थ" असाही अर्थ सापडला. इतक्यात मला कै. पूज्य नरसिंहस्वामींनी बाबांची रचलेली सहस्रनामावलीही इंग्रजी अनुवादासह मिळाली. त्यात **'कातर'** शब्द कुठे इतर नावात सापडतो का म्हणून शोध करू लागलो आणि आश्चर्य म्हणजे अनुक्रमांक ६४२ वर नेमके "**ॐ भक्तानुग्रहकातराय नमः**" हे नाव " who is anxious to favour devotees " या इंग्रजी अनुवादासह सापडले. मग लगेच शब्दकोशात सापडलेल्या "अस्वस्थ" (agitated) या शब्दाला "तळमळ" हा अति योग्य शब्द मला सुचला आणि "भक्तांवर अनुग्रह (उपकार) करण्यासाठी तळमळत (अस्वस्थ) असलेल्या साईनाथांना नमस्कार असो" असा समाधानकारक अनुवाद लिहून काढला.

या घटनेवरून माझ्या लक्षात आले की कै. पूज्य नरसिंहस्वामीनीं वरील नाव बाबांसाठी किती योग्य निवडून काढले आहे? भक्तांवर अनुग्रह तर सर्वच देव व संत करतात. देव त्यांना जे जसे भजतात तसे त्यांना फल देतात व त्यांचा पृथ्वीवरील अवतार साधूंचे संरक्षण, दुष्टांचा नाश आणि धर्म संस्थापना या साठीच असतो. भगवान श्रीकृष्णांनी गीतेत म्हटलेच आहे :–

**ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् ।**
(अ. ४ श्लो. ११)

**परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।**
**धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।।**
(अ. ४ श्लो. ८)

परंतु संतांचे तसे नाहीं :–

**"संतांची योग्यता भली । देवाहुनी आगळी ।**
**अजादुजास नाहीं मुळी । स्थान जवळ साधूंच्या ।।७६।।**
**हिरण्यकश्यपु–रावणाला । देवद्वेषे मृत्यु आला ।**
**तैसा एकही नाहीं घडला । प्रकार संत हस्ताने ।।७७।।**
**संत सुष्टदुष्टांप्रति । समसमान निश्चिती ।**
**उलट पाप्यावरी प्रीती । अलोट त्यांची वसत असे ।।७८।।**
(श्रीसाईनाथस्तवनमंजरी)

परंतु श्रीसाईबाबांची करणी तर सर्वांहून वरचढ. देव आणि संत वर म्हटल्या-प्रमाणे भक्तांवर किंवा निंदकांवर अनुग्रह करीत, परंतु केव्हा? त्यांच्याशी संबंध आल्यावर किंवा त्यांची प्रार्थना ऐकल्यावर. पण श्रीसाईबाबा तर ज्यांनी त्यांचे नावही कधी ऐकले नव्हते किंवा ज्यांनी संकटातून सोडविण्यासाठी त्यांना प्रार्थ-नाही केली नव्हती, त्यांचेवरही अनुग्रह करीत असत. एवढेच नव्हे तर त्यांना आग्रहाने बोलावून बळजबरीने वाईट मार्ग सोडावयास लावित असत. खरोखरीच भक्तांवर अनुग्रह करण्यासाठी तळमळणारा बाबांसारखा संत विरळाच नव्हे अद्वि-तीयच!

श्रीसाईसच्चरितातीलच उदाहरणे घेऊ या. लाला लखमीचंदाने बाबांना कधी पाहिले होते का? त्यांचे नावसुद्धा माहित नव्हते. पण बाबांनी त्याला स्वप्नात

जाऊन दर्शन दिले. नंतर आपली तसबीर दासगणूमहाराजांच्या कीर्तनांत दृष्टीस पाडली आणि पैशाची व सोबतीची तूट भरून काढून आपल्या पायाजवळ बोलावून घेतले. इतकेच नव्हे तर त्यांच्या मनातील सर्व इच्छा पूर्ण करून आपल्या भक्तीला लावले. रामलाल पंजाबीचेही तसेच. त्यानेही कधी बाबांविषयी ऐकले नव्हते. परंतु त्याचेही स्वप्नात जाऊन त्याला 'मजकडे येऊन जा' असे म्हणाले. दुसरे दिवशी बाजारात आपली तसबीर दृष्टीस पाडून आपला ठावठिकाणा माहित करून दिला आणि शिरडीस आल्यावर आपल्या निर्वाणापर्यंत जवळ ठेऊन घेतले. काकासाहेब दीक्षितांना व सप्तशृंगीच्या काकाजींना तर शामाला काहीतरी निमित्ताने तिकडे पाठवून आपणाकडे पाचारण केले आणि त्यांच्या मनाची अशांती दूर केली. नानासाहेब चांदोरकर प्रांताधिकारी परंतु त्यांना एकदा नाहीं तीनदा भेटून जाण्यास निरोप पाठविला आणि आल्यावर पायाशी दृढ करून ठेवले. दासगणू तर पोलीस शिपाई व तमाशातील लावण्या रचणारे छंदी गृहस्थ. पण त्यांच्याही मागे लागून त्यांना पोलीस खात्यातील नोकरी सोडावयास लावली व लावण्यांच्या नादातून वर ओढून अर्वाचीन संतांची चरित्रे लिहवून घेतली, आणि एका महान संतात त्यांचे रूपांतर केले. गोमांतकातील गृहस्थाला बाबांचे कधी दर्शन, चिंतन किंवा श्रवणही घडले नव्हते. तरी त्याचे तीस हजार रुपये चोरीस गेल्यावर फकीर वेषाने इतक्या दूर प्रत्यक्ष जाऊन त्याला आवडता पदार्थ सोडण्याचा व शिरडीस जाण्याचा उपदेश करून त्याचे सर्व पैसे परत मिळवून दिले. इतकेच नव्हे तर पुढे जेव्हां त्याला शिरडीस जाण्याचा विसर पडला तेव्हां त्याला त्याची आठवण देऊन, आगबोटीच्या प्रवासातील अडचणी दूर करून शिरडीस आणून सोडले आणि आपल्या सर्वव्यापकतेची आणि निजसर्वांतर्यामित्वाची जाणीव करून देऊन आपलासा करून घेतले.

मिरीकर मामलतदारांना काय पुढच्या संकटाची कल्पना होती का त्यांनी बाबांना आपले रक्षण करण्यासाठी प्रार्थना केली होती? पण बाबांना आगामी संकटाची जाणीव झाल्याबरोबर मिरीकरांचे सोबतीस शामाला आग्रहाने चितळीस पाठविले आणि मिरीकरांना सर्पदंशापासून वाचविले. नानासाहेब चांदोरकरांचा टांगा दूर पुण्यात उलथून पडला होता आणि ते व त्यांच्या बरोबरचे लेलेशास्त्री टांग्यातून बाहेर फेकले जात होते. परंतु त्यांची शिरडीस बाबांना काळजी! बाबांनी जोराने शंख केला आणि ओरडले, "अरे! नाना मरतोय पण मी काय त्याला मरून देईन?" आणि खरोखरच नानासाहेब व लेलेशास्त्री या दोघांनाही मुळीच दुखापत न होता त्यांचा प्राण वाचला.

बाबांचा लाडका भक्त शामा अशिक्षित व खेडवळ. संस्कृतातील गीता किंवा अवघड मराठीतील ज्ञानेश्वरी किंवा एकनाथी भागवत त्याला काय समजणार? परंतु त्याचे कल्याणाची बाबांना केवढी काळजी? पोटात दुखण्याचे ढोंग करून संन्याशाला बाजारात सोनामुखी आणावयास पाठविले आणि मग त्याची विष्णु-सहस्त्र नामाची पोथी उचलून बळजबरीने शामाच्या गळी बांधली आणि त्याला जणू काय अप्रत्यक्षपणे या अत्यंत महत्त्वपूर्ण व पुण्यप्रद पोथीची दीक्षाच दिली.

डहाणूच्या देव मामलतदाराकडून ज्ञानेश्वरीचे वाचन होईना. सारख्या अडचणी येत. शेवटी बाबा आपण होऊन ती वाचावयाला आज्ञा देतील तरच ती वाचावयाला घ्यायची असा त्यांनी निश्चय केला. बाबांनी त्यांचा हा हट्ट नुसता पुरविलाच नाही तर काही दिवसांनी स्वप्नात जाऊन पोथीचा अर्थ समजण्यासाठी ती कशी वाचावी हेही समजावून सांगितले. केवढी भक्तांबद्दल आस्था!

वरील सर्व आधीच भक्त होते किंवा नंतर झाले. परंतु अमीर शक्कर आपले दुखणे बरे होण्याच्या स्वार्थाने बाबांकडे आला व बाबांनी त्याला चावडीत राहण्यास सांगितले पण अमीर शक्करास थोडेसे बरे वाटल्यावर तो कोंडवाडा वाटला व बाबांची परवानगी न घेता कोपरगांव येथे पळून गेला. परंतु तेथेही बाबांनी जाऊन एका वृद्ध फकीराचे सोंग घेऊन मृतावस्थेत पडून अमीर शक्करला भीतीने पळावयास लावून परत शिरडीस आणले. पुढे या आज्ञाभंगी गृहस्थाला बाबांनीच सर्पदंशापासून वाचविले. किती 'लाभेविण प्रीती' करण्याची तऱ्हा!

या झाल्या गोष्टी बाबा देहधारी असतानाच्या. परंतु बाबांच्या निर्वाणाला आज ६५ वर्षे होत आली तरी लोकांना वर सांगितल्या सारखेच अनुभव अजून ही येतात आणि बाबांच्या खालील वचनांची प्रचीती येते:—

**माझे माणूस कितीही दूर। असेना साता समुद्रापार।**
**चिडीसारखा मी बांधूनिया दोर। ओढूनि सत्वर आणितो॥अ.५१ओ.२८॥**

अलीकडचा माझाच अनुभव सांगतो. आमच्या पुण्यातील सोसायटीत एक श्रीमंत व अद्यावत् पद्धतीनें राहणारे तरूण जोडपे आहे. एकदा ती तरूणी माझ्या पत्नीकडे आली व शिरडीला कसे जावयाचे व तेथे दर्शनाची कशी सोय आहे वगैरे माहिती विचारू लागली. ती म्हणाली, मला शिरडीस श्रीसाई-बाबांच्या दर्शनाला गेलेच पाहिजे." माझ्या पत्नीने कारण विचारल्यावर ती

म्हणाली. दोन दिवसांपूर्वी संध्याकाळी मी माझ्या ५–६ वर्षांच्या मुलीसह उंपात महात्मा गांधी रोडवर कपडे खरेदी करावयास गेले होते. खरेदी आटपून कपड्याचे बंडल घेऊन दुकानाच्या बाहेर यते तो माझी मुलगी कुठे दिसेना रस्त्यावर पुढेमागे बऱ्याच वेळा जाऊन आले पण गर्दीत ती सापडेचना. मी फार घाबरून गेले आणी कसे काय कुणास ठाऊक माझ्या तोंडून एकदम साईबाबांचे नाव निघाले. तशी मी साईबाबांची भक्त नाही. एवढेच काय साईबाबांबद्दल किंवा शिरडीबद्दल मला कांही माहितीही नाही. कधी तरी 'साईबाबा' हे नाव कानावर आलेले एवढेच. पण काय आश्चर्य! साईबाबांचे नाव घेताच मी ज्या दिशेला चालत गेले तिकडे लगेच माझी मुलगी मला दिसली आणि माझा जीव ठिकाणावर आला. मला खूप आनंद झाला, साईबाबांबद्दल कृतज्ञतेने मन भारावून गेले आणि आता शिरडीला जाणे भागच आहे असे वाटले." वाचकांनो! आहे की नाही गम्मत! अगदी अभक्ताला देखील संकटातून वाचवून आपणाकडे ओढून आणण्याची केवढी तळमळ?

असा भक्तांवर देहधारी असतानांच नव्हे तर देहत्यागानंतर –६०–६५ वर्षांनंतरही अनुग्रह (उपकार) करण्यासाठी तळमळत असलेला संत कुणी कधी पाहिला किंवा ऐकला आहे का? खरोखरीच श्रीसाईबाबा हे अद्वितीय संत होते आणि त्यांना "संत चूडामणी" हे अभिधान खरेच यथार्थपणे शोभते.

## दादर येथील रामनवमी उत्सव

संस्थानच्या दादर येथील श्रीसाईनिकेतन येथे रामनवमी उत्सव मंगळवार दि. १०–४–८४ रोजी साजरा केला जाईल. दुपारी १२ वा. श्रींची आरती होईल व त्यानंतर तीर्थप्रसाद वाटप होईल. शिरडी येथे जाऊ न शकलेल्या भक्तमंडळींनी साईनिकेतन मधे येऊन श्री बाबांच्या दर्शनाचा लाभ घ्यावा.

# श्रीराम चरित मानसाचा महिमा

–सौ. कुसुमताई जोग. प्रेरणा, आंग्रेवाडी, मुं. ४

●श्री तुलसीदासांनी "राम चरित मानसात" मानसाचे रूपक फारच बहारीचे केले आहे. मानसाला तलावाची उपमा दिली आहे. त्याबद्दल थोडेसे लिहिते. मनुष्यापुढे २ मार्ग आहेत. अेक शाश्वत व अेक अशाश्वत. कुठल्या मार्गाने जायचे ते प्रत्येकाने निश्चित ठरवले पाहिजे. व त्याप्रमाणे आचरण करायला पाहिजे हे मुख्य आहे.

शाश्वताचा मार्ग म्हणजे, भगवंताची भक्ति करणे, त्याच्यावर प्रेम करणे, त्याचे ज्ञान करून घेणे, वगैरे वगैरे त्यात सर्व आले.

सत्संगती म्हणजे संत संग करणे, सतग्रंथांचे वाचन करणे हे पण सत्संगतीतच बसते, व जेणे करून मनुष्य जन्माचे सार्थक होईल असे आचरण करणे व त्यायोगे स्वत:चा उद्धार करणे. सर्व संतांनी आपल्यावर ग्रंथांच्यारूपाने फार मोठे उपकार करून ठेवले आहेत. त्या सर्व संतांना एकच तळमळ कीं, मनुष्यांनी आपला उद्धार करून घ्यावा, अशा ह्या ग्रंथांच्या पैकीच श्रीरामचरितमानस हा एक अलौकिक ग्रंथ आहे.

आता सर्वच मानसा बद्दल लिहावयाचे तर फारच कठीण. त्यातले एका रूप-बद्दल लिहिते, श्री तुलसीदासांना जे विशेष सांगायचे ते असे कीं, "सप्तबंध सुभग सोपाना", "ग्यान नयन निरखत नमाना"

आता "ग्याननयन" हे मुद्दाम घातले आहे. वरवर मानसाचे वाचन होण्यापेक्षा 'ज्ञाननयनाने" जर झाले तरच सार्थक आहे. ही जी ७ कांडे आहेत त्यांना "सुभग-सोपाना" म्हटले आहे. ह्या ७ पायऱ्या आहेत. ह्या तलावाचे ४ घाट सांगितले आहेत. त्याच्या ह्या प्रत्येक घाटाच्या ७ पायऱ्या आहेत. आता, "ग्यान नयन" का म्हटले तर प्रत्येक पायरी हे अेकेक कांड आहे. मानसात ७ कांडे आहेत प्रत्येक घाटाला ७, पायऱ्या, प्रत्येक कांडात संबंध रामायण आहे. हे वाचतांना कळते. म्हणून "ग्यान नयन" म्हटले.

॥ रघुपति महिमा अगुन अबाधा ॥
॥ बरनब सो इवर बारि अगाधा ॥

॥ पुरइनि सघन चारू चौपाई ॥
॥ छंद सोरठा सुंदर दोहा ॥
॥ सोइ बहुरंग कमल कुल सोहा ॥

श्रीरामचंद्रांचा महिमा हे अगाध पाणी आहे, आता पुरइनि म्हणजे कमल वेली सघन आहेत. म्हणजे दाट वेली आहेत. त्या चौपाया, छंद, सोरठे, दोहे ही नाना कमळे आहेत, आणि मुख्य म्हणजे "हरिवदिरतिरस" जो वेदांत वर्णिला आहे तो ह्या मानसाच्या वाचनाने मिळतो.

॥ आवत ऐहि सर अति कठिनाई ॥
॥ रामकृपाबिनु आई न जाई ॥
॥ सकल बिघ्न ग्यापहिं नहितेही ॥
॥ राम सुकृपा बिलो कहिं जेही ॥

आता पुढे लिहितात कीं,

॥ अवलोकनी बोलनि मिलनी प्रीति परस्परहास ॥
॥ भायप भलि चहबंधुकी । जल माधुरी सुबास ॥

ह्या मानसरूपी तलावाचे पाणी कसे आहे.

॥ अदभुत सलिल सुनत गुनकारी ॥
॥ आसपिआस मनोमल हारी ॥

म्हणजे हे पाणी अदभूत आहे. ऐकले असता गुण देणारे आहे. आशा, आकांक्षा वासना हे मनाचे मळ घालविणारे आहे. शरिराचे मळ जातील पण मनोमल जाणे फार कठीण. मनाचाच उद्धार करायचा आहे. आत्मा तर मुक्तच आहे. म्हणून तर समर्थांनी मनाला उपदेश केला आहे. मेल्यावर आपल्या बरोबर मनच ह्या वासना घेऊन येते. व जन्ममरणाचे फेरे त्याच्यामुळेच. तेच जर भगवंताच्या चरणाच्या ठिकाणी जडले तर तिथून ते हलायला तयार नसते. म्हणून त्याला शिकवायचे.

काम, क्रोध, मोह ह्यांचा नाश करून विवेक वैराग्य वाढविणारे ह्या मानसाचे पाणी आहे. म्हणून "अदभुत सलिल" म्हटले. त्या पाण्याची गोडी म्हणजे प्रेमभक्ति. हे पाणी मधुर म्हणजे गोड, सुंदर व मंगल करणारे

आहे. आता हे पाणी "सुमतिन्भुमिथल" म्हणजे ज्याची जशी ग्रहण करण्याची ताकत असेल त्याच्या हृदयांत स्थिरावणारे आहे. कारण खोलपणा असल्याशिवाय पाणी रहाणारच नाही. सपाट जागी वाहून जाईल. "बेद पुराण उदधि घनसाधू" हे मागे सांगितले आहेच. वेद पुराणे संस्कृत भषून म्हणून ती सागरासारखी खारट. सामान्य माणसाला ती उपयोगी नाहीत. संत हे घनासारखे आहेत. ते संस्कृतमधले प्राकृतात करून खारट पाणी गोडे करून तुम्हाला पाजत आहेत ते सर्वांनी प्यावे व आपले कल्याण करून घ्यावे. हीच सर्व संतांची इच्छा आहे. सर्वसाधारण माणसाना निर्गुण उपदेश डोक्यावरून जातो.

॥ सगुनहिं अगुनहिं नहिं कछु भेदा ॥

असे मानसातच तुलसीदासांनी सांगितले आहे.

॥ जे गावहिं यह चरित सँभारे ।

॥ तेइ अेहिताल चतुर रसचारे ॥

ह्या तलावाचे चतुर राखणदार कोण तर जे हे चरित्र "संभारे" म्हणजे समजून वाचतात, गातात ते म्हणजे त्यात सांगितलेले आचरणात आणतात. म्हणून चतुर राखणदार म्हटले आहे. तलावाचे रक्षण करणे म्हणजे केरकचरा कोणी टाकेल. हातपाय धुतील, पालापाचोळा पडणार नाही ह्याची दक्षता घेणे वगैरे वगैरे. हे रखवालदाराचे काम आहे. ह्या तलावाची उपयुक्तता योग्य माणसालाच होते हे पण ध्वनित केले आहे. पुढे म्हटले आहे की,

॥ आवत अेहिसर अति कठिनाई ॥

॥ रामकृपाबिनु आ इन जाई ॥

हा तलाव सामान्य नाही. राम यशाने काठोकाठ भरलेला आहे. जे नेहमी मानस आदराने अैकतात ते मानसाचे अधिकारी आहेत. म्हणजे ह्याची राखणदारी पण किती कठीण आहे पहा. तेच इथे येण्याचे अधिकारी आहेत. अनधिकाऱ्याला इकडे फिरकू द्यायचे नाही. भारतभूमि कर्मभूमी आहे. ह्या कर्मभूमीत जसे जसे कराल तसे तसे फळ मिळते. म्हणून सद्ग्रंथांचे वाचन, मनन व ईश्वरभक्ति करायची.

॥ मनकरि बिषय अनलबन जरई ॥

॥ होइ सुखी जौं अेहिसर परई ॥

जे मन विषयरूपी अग्निने जळते म्हणजे जे विषयाच्या चिंतनात मग्न असते ते मन ह्या तलावात आंघोळ केली असता सुखी होते. म्हणजे स्थिर होते. म्हणजे मनाच्या ज्या वासना, आशा, आकांक्षा असतात त्या ह्याच्या वाचनाने समूळ नाहिशा होतात. रामायणाच्या आरतीत श्री तुलसीदासांनी म्हटले आहे की,

॥ कलिमल हरनि बिषयरस फीकी ॥

जो जो रामायणाची पारायणे होतील तो तो मन आपोआप स्थिर व्हायला लागते. मनापासूनच सर्व विषयांचा त्याग घडतो. मुद्दाम करावाच लागत नाही. मनापासून होणे हेच मुख्य आहे. विषय सोडू म्हणून सुटत नाहीत. ईश्वरीकृपा व संतांच्या आशिर्वादानेच ते घडते. अशा ह्या मानसांच्या वाचनाने सर्वांनी आपले कल्याण करून घ्यावे. हिंदी म्हणून वाचायचे नाही असे करू नये. रोज वाचत गेले की आपोआप समजायला लागेल. श्री हनुमानजींना प्रार्थना करावी. ते कुठेही रामायण सुरू असले कीं, हजर असतातच. म्हणून त्यांना पाट मांडायची पद्धत आहे. तुम्ही पाट मांडा अगर न मांडा ते येणारच.

॥ नहिं कोऊ राम चरन अनुरागी ॥ सियावर रामचंद्र की जय.

---

# शिरडीतील रामनवमी उत्सव

दरवर्षीप्रमाणे शिरडी येथे श्रीरामनवमी उत्सव यंदाही सोमवार दि. ९–४–८४ (चैत्र शु. ८ शके १९०६) ते बुधवार दि. ११–४–८४ अखेर असे तीन दिवस साजरा होणार आहे. तरी भक्तमंडळींनी हेच निमंत्रण समजून उत्सव प्रसंगी आपले कुटुंबीय व स्नेहीमंडळीसह हजर राहून सर्व कार्यात सहभागी होऊन संस्थानलाही सहकार्य करावे अशी विनंती न्यायाधारक श्री. क. हि. काकरे साहेब, श्री साईबाबा संस्थान, शिरडी हे करतात.

# ईश्वर ही व्यक्ती नसून शक्ती आहे

—श्री. पां. शं. भुजबळ
संस्थापक व अध्यक्ष सद्गुरू श्री साईबाबा
मंदिर संस्था साईनगर, (गोडोली),
सातारा—४१५ ००२.

० सध्याच्या अणू व विज्ञान युगांत प्रत्येक व्यक्ती अति शिक्षणाने नास्तीकतेच्या मार्गाने जावू लागली आहे ही आपल्या ह्या संत भूमीत अत्यंत भयानक घटना असून देशाच्या नाशासच कारणीभूत होणार आहे. चांगले सूज्ञ विचारवंतही "पोथ्या गुंडाळून ठेवा" असा भाषणातून प्रचार करीत आहेत ही गोष्ट अत्यंत चुकीची ठरणार आहे. पोथ्या म्हणजे काय याचा जर सखोल विचार केला तर सत् मार्गाने जाण्याचे वाटाडे, ह्या मार्गाने संत गेले व त्यांना मार्गात जे चांगले व वाईट अनुभव आले ते त्यांनी लिहून आपल्या पुढील पीढीचे कल्याणच केले आहे. आजही त्याच संतांचे पोथ्यांचे प्रसंगांचे तत्वांचे जर आचरण केले तर आपणांवर कधीच दैन्यावस्था येणार नाही. सध्या जी बुवाबाजी भोंदुगिरी चालू आहे. त्यात मात्र लोक, पुढारी हे ही एक प्रकारची बुवाबाजीच करीत आहेत. पूर्वीच्या संतांनी सत् मार्गाने जाण्यास शिकवले तर ती बुवाबाजी होत नाही व भोंदूगिरीही होत नाही. तेव्हा सूज्ञ व्यक्तींनी संतांच्या पोथ्यांचे जरूर अनुकरण करून अंध श्रद्धेवर न जगता डोळस दृष्टी ठेवून चांगले व वाईट पारखून घ्यावे. त्यास आग्रह नाही. कोणाही एका व्यक्तीस आलेला वाईट अनुभव आपणांस येणारच नाही असे म्हणून चालणार नाही. म्हणून आपणही दुसऱ्याचे अनुभवाने शहाणे होणे अत्यंत जरूर आहे. आपणासही वाईट अनुभव येवू देण्याची वाट पहाणे जरूरीचे नाही. म्हणून पोथ्या हेच आपले चालते बोलते ह्या विज्ञान युगातील गुरू आहेत. १०० वर्षापूर्वी श्री महात्मा फुले ह्या महान व्यक्तीने स्त्रीशिक्षण, अस्पृश्यता निवारण ह्या संबंधीत जे ग्रंथ लिहीले ते ग्रंथ आजही अनुकरणीय आहेत. ते ग्रंथ आज टाकावू म्हणून फेकून देणे योग्य होईल का? शंभर वर्षापूर्वी जे लिहून ठेवले ते आजच्या काळात अगदी अनुरूपच आहे. असे असताना संत महंतांच्या पोथ्या पुराणे फेकून द्या असे म्हणणे म्हणजे आपणच आपल्या पूर्वजांचा अपमान करून त्यांच्या मौलीक तत्वांची पायमल्ली करणे योग्य नाही. त्यांचे त्यावेळचे अनुभव आजही ह्या महान अणू व विज्ञान युगांत उपयोगी पडत आहेत.

ईश्वर ही केव्हांही दाखवता न येण्याजोगी वस्तु आहे. तिला आकार नाही, रंग नाही, वास नाही असे असतांना आपण ईश्वर कसे दाखवू शकू, तर ईश्वर ही श्रद्धेची बाब आहे. ईश्वर एक अद्वितीय व अतींद्रीयशक्ती आहे. त्या शक्तीची आपण उपासना केली तरच ईश्वराचा साक्षात्कार होतो. तो साक्षात्कार होण्यास आपणांस सत्य, न्याय, प्रामाणिक, एकनिष्ठ मार्गाने जावे लागते हेच सर्व संतांनी पोथीतच सांगितले आहे. त्याच मार्गाने ते गेले व संत झाले म्हणूनच ते आपणांस सांगत आहेत. तेव्हा आपणही त्याच मार्गाने जाऊन ती शक्ती संपादन करावयास पाहिजे. तेव्हा कोणत्याही संतावर व त्यांचे ग्रंथावर श्रद्धा ठेवलीच पाहिजे. त्यांचे पोथीची पारायणे करावयास पाहिजेत. त्या पोथीतील प्रत्येक तत्वाचे आचरण आपणांकडून झाले म्हणजेच त्या पोथ्यांची पारायणे करणेचे सार्थक होईल. नुसती हजारो पारायणे करून आकड्यावर आकडा चढवून ईश्वर शक्ती आपले अंगात संचार करीत नाही. तर त्या पोथीत सांगितलेल्या सर्व तत्वांचे आचरण झाले पाहिजे. आपल्या प्रत्येक कृतीत त्याचे प्रतीबिंब उमटले पाहिजे. कोणत्याही बाजूने पाहिले, तपासले तर आत बाहेर एकच रंग दिसला पाहिजे. म्हणजे ईश्वर ही एक जी शक्ती आहे.तीच आपले अंगात संचार करते म्हणून पैगंबरवासी प. पूज्य महंमद पैगंबर म्हणतात, "ईश्वर यह देखनेकी चीज नहीं हैं। यह यकीन की बात है"। या तत्वानुसार ईश्वर हा कधीच कोणालाच दाखवता येणार नाही. तर ती एक विश्वासाची गोष्ट आहे. म्हणून आपण आपला उद्धार करून घ्यावयाचा असेल तर आज.या युगात, शिर्डीचे महान संत श्री साईबाबा ह्यांची तत्वे फारच उद्बोधक असून प्रपंच व परमार्थ करणेस योग्य आहेत. त्यांच्या पोथीची तत्वे पाहिली तर आजचा समाज हा अधोगतीला जो चालला तो सावरला जाईल. पण तिकडे कोण पहातो नुसता मी शिर्डीला १० वेळा जाऊन आलो, २५ पारायणे केली पण तुम्हाला त्यातून काही मिळालेकी तुम्ही त्यातून कांही उचलले का? अहो, साधे शेण जमिनीवर पडले तर ते माती घेऊन येते हे केवढे तत्वज्ञान आहे. आपण शिर्डीस गेलो काय व पोथ्यांचे पारायण केले काय. त्यातून तुम्ही काय उचलले, पचवले ह्याचे आत्म संशोधन करणे जरूर आहे. ईश्वर ही एक शक्ती आहे आणि तीच शक्ती संतांचे ठिकाणी वास करीत असते. कारण ती त्याने महान कष्टाने मिळविलेली असते. तेव्हा आपण ही तीच शक्ती त्यांचे तत्वांचे आचरण करून मिळवली पाहिजे. म्हणजे आपण संतासमान होणे अवघड नाही पण आधी केले पाहिजे.

ईश्वर ही एक अदृश्य शक्ती आहे. ती प्रकट करणेस तिचा एक, प्रकारचा ध्यास घ्यावा लागतो. ही शक्ती प्रत्येक प्राणी मात्राजवळ असते. फक्त तिची त्याला जाणीव होत नाही. कारण तो तेथपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करीत नाही. मनुष्य प्राण्यास वाचा सिद्धी आहे. बुद्धी आहे. पण त्याचा उपयोग करून घ्यावयास पाहिजे. प्राणी ही अत्यंत शक्तीवान असतात, त्यांचे जवळ शक्ती आहे. तिलाच दृश्य रूप प्राप्त झाले म्हणजेच आपण त्याला साक्षात्कारी शक्ती म्हणतो. मग ती मानवात असो अगर प्राणी मात्रांत असो. आपण न सांगता न चुकता न भिता लीन होतोच ना, मग का लीन होतो? तर त्याने आपल्या अदृश्य शक्तीचे रूप प्रगट केलेले असते व ते प्रगट होण्यास त्याला किती तपश्चर्या करावी लागली हे कोणास दिसत नाही, आणि ती त्याला दिसणार नाही. कारण इतके पहाणेस वेळ सवड व आवड कुठे आहे! म्हणून मी अनुभवाने म्हणतो की ईश्वरी शक्ती ही प्रत्येक प्राणी मात्रात असते. आपल्या जवळ काय आहे. आपण कोण आहोत. ह्याचेच त्याला ज्ञान होत नाही. कारण, आपण जिज्ञासूरूपी ३ रा डोळा कधी उघडतच नाही आणि म्हणूनच ती आपणास दिसत नाही. ईश्वर कोठे नाही! प्रत्येक वस्तूत आहे. फक्त श्रद्धा असली तरच तो कोठेही दिसतो. फक्त पहाणेचा डोळा आपण उघडला पाहिजे. आजच्या युगात ह्यात काय आणि त्यात काय असे म्हणणारांना ईश्वर कदापिही दिसणार नाही. भक्त प्रल्हादाने खांबात ईश्वर दाखवून दिला. श्री संत श्रीसाईबाबांनी आपला चिमटा आपटून अग्नी निर्माण करून अग्नी देवरूपी ईश्वर दाखवून दिला. तो कसा दाखवला तर त्यांची त्या खांबावर व चिमट्यावर आपल्या स्वतःवर, आपल्या कृतीवर, आचरणावर आपल्या शब्दावर विश्वास होता. म्हणूनच ते ईश्वर दाखवू शकले.

# देव भावाचा भुकेला

—सौ. उषाताई अधिकारी,
सावित्री सदन, बंदर रोड, रत्नागिरी.

० प्रभू रामचंद्र दंडकारण्यात येणार याचा सर्व आश्रमवासियांना आनंद होऊन जो तो त्यांच्या स्वागताची तयारी करू लागला. यात प्रभूचे एक खुळे वेडे होते. ते विशेष आनंदले होते. शबरी (तेच वेडे) ही भिल्लीण अगदी दरिद्री. जीर्ण झोपडी, फाटकी तुटकी वस्त्रे. मिळाले अन्न तर मिळाले, नाही तर नाही अशी स्थिती. पण रामचरणी अनन्य भाव, निष्ठा. राम येणार याचा तिला परम हर्ष झाला. माझ्या रामासाठी काय करू आणि काय नको असे तिला झाले. ती वेड्यासारखी रानातून धावू लागली. झाडाची फुले तोडू लागली. म्हणू लागली, अग वेलींनो, चांगली चांगली फुलं द्या बरं का मला आज. माझा राम यायचाय ग. त्याला छानसा हार करीन. फळे गोळा करतांना तर ती मधेच हसत होती. आनंदाश्रू येऊन रडत होती. म्हणत होती, प्रभूला आंबट कडू फळे नकोत हो ! मी त्याला पाहिला नाही अजून पण अगदी कोमल आहे म्हणतात माझा राम ! प्रत्यक्ष देवच आहे तो. त्याला कच्ची, कडू, आंबट फळे कशी बरं देऊ ? मी म्हातारी. मला काही झाडावर चढता येत नाही. तेव्हा ही पडलेली फळेच मी निवडून घेते. माझा रामराया नक्कीच ती खाईल. भक्तिरसात बुडालेली ती वृद्धा बोरीची फळे गोळा करत होती. हसत होती. गात होती व प्रत्येक बोर किंचित चाऊन बघत होती. गोडी बोरेच तेवढी आपल्या फाटक्या पदरात ठेवत होती. जरूरी पुरती फळे जमताच ती आपल्या झोपडीत आली, तिने रानफुलांचा हार केला. अंगण सारवले रांगोळी, गालिचा हे प्रकार तिच्या गरिबाकडे कुठले असणार? एक फाटके आसन तिने ठेवले. इतक्यात खरोखर रामचंद्र आले. कल्पनेहून गोड असणारे त्यांचे मुखकमल पाहून शबरीला विलक्षण आनंद झाला. ती एकटक रामाकडे पाहू लागली. भक्तीप्रेमाचे रोमांच अंगावर उमटले. डोळयात प्रेमाश्रूंनी गर्दी केली. कंठ दाटून आला. प्रभूच्या परम कोमल पायावर लोळण घेत तिने तो हार त्यांच्या कंठात घातला. आपल्या पदरातील बोरे त्यांच्या ओंजळीत ठेवत ती म्हणाली, "देवा, हा रानचा मेवा घ्या. खास तुमच्यासाठी गोळा केलाय. आंबट, कच्चा नाही. चांगला गोड आहे." रामाचे निर्मळ प्रसन्न डोळे शबरीच्या मुखावर प्रेमाचा वर्षाव करीत होते. पण लक्ष्मणाचे लक्ष त्या उष्ट्या बोरांकडे होते.

तो हळूच रामाला म्हणाला, अरे ही बोर उष्टी आहेत खाऊ नकोस. राम निर्मळ हसला. लक्ष्मणाच्या पाठीवर हात ठेवीत तो म्हणाला, "लक्ष्मणा भक्ती असावी तर अशी निर्मळ. तिच्याजवळ कुटिलपणा नाही. आहे ते एक प्रेम. शुद्ध भाव. दृढ श्रद्धा. तिला मी तिचा ईश्वर वाटतो. मी ही खाईनच, हा तिचा विश्वास. रानोमाळ हिंडून तिने ती माझ्यासाठी गोळा केली आहेत. त्या तिच्या भोळ्या भावाहून मला अधिक काय प्रिय आहे? रामाने ती उष्टी बोरे मिटक्या मारीत खाल्ली. पहाणारे सर्व चकीत झाले. ईश्वराकडे भेदभाव नाही. तिथे एक भाव पाहिजे. हे त्यांना कळून चुकले. दरिद्री शबरीचे जीवन प्रभुदर्शनाने, प्रभु स्पर्शाने कृतार्थ झाले.

आपला राम म्हणजे आपले सर्वांचे श्रीबाबा. त्यांच्याही जवळ एक अशीच भक्त स्त्री होती. कधीही प्रकाशात न आलेली. कुणाच्याही ओळखीची नसलेली, भोळसर, फाटके तुटके नेसलेली, झिज्या सोडलेली, चिंध्या बांधलेली, काठी टेकीत चालणारी. तुकडे मागून खाणारी, नवऱ्याने टाकलेली ही श्री-बाबांची म्हाली. सगळीकडे यात्रेला जाणारी. शिर्डीत आली आणि तिथेच राहिली. तिचे बाबांवर विलक्षण प्रेम, दृढ श्रद्धा. बाबा हाच तिचा परमेश्वर. तिला साई म्हणता येत नसे, ती 'शाईबाबा शाईबाबा' असे म्हणे. सर्वांजवळ एकच मागायचे, "बाबा, आई मला पोटाला द्या. मला सांभाळा. शाईबाबा तुमचे कल्याण करील. लुगडी मला ध्या. पगार द्या." म्हाली शबरीप्रमाणेच रानफुले गोळा करून श्रीबाबांना माळा करून भक्तीप्रेमाने घालीत असे. बाबा भिक्षा मागून आणत त्यातले अन्न तिला रोज देत. पण पैसे मात्र कधीच देत नसत. ती म्हणे," बाबा माझ्या सपनात येतात. म्हणतात म्हाळे, तुला दागिने देईन. रुपया देईन. तुझ्यावर जे कोणी रागावतील त्यांना माझ्याजवळ ठेवून घेणार नाही. मी तुझे कल्याण करीन. तुझा सांभाळ करीन. तू फक्त मला शाईबाबा, शाईबाबा म्हण मग बघ मी तुझ्यापुढे हजर राहातो की नाही.'

ती सगळे बडबडून दाखवी तेव्हा तेथील लोक तिला वेडी म्हणत. तिची चेष्टा करीत. पण ती वेडी नव्हती. लोकांच्या चेष्टेकडे तिने कधीच लक्ष दिले नाही. उलट ती आपल्या निजानंदामधे मग्न असे. बाबांवर तिची अलोट भक्ती असल्याने श्रीबाबांच्या कृपेने तिला काव्यस्फूर्ती झाली. 'शाईबाबा, शाईबाबा' हा जप करता करता तिचा शाईबाबा काव्यात गुंफला गेला. तिला शिक्षण नव्हते. कुणी शिकवणारे नव्हते. पण आपल्या काव्यात तिने श्रीबाबांना

सत्वशील म्हटले आहे. श्रीबाबा काय करतो तर आंधळयाला डोळे, पांगळयाला पाय देतो. माझा शाईबाबा चांदीच्या घंगाळात पाणी घेऊन सूर्यासमोर आंघोळ करतो. गावोगावचे लोक शिर्डीला येतात. शाईबाबाला नवस करतात आणि तो नवसाला पावतो. शिरडीसारखे गाव जगात कुठे नाही आणि शाईबाबा-सारखा देव नाही. मी शाईबाबाची लेक आहे. तो मला काळ्या तांबड्या रेघांचे लुगडे घेईल. माझा शाईबाबा ब्रम्हचारी आहे. तो बायकांची सावलीही घेत नाही. तो कधीच खोटे बोलत नाही. रामनवमीला त्याचा ऊरूस भरतो. मी काम करत असते तेव्हा माझ्या मागोमाग येऊन शाईबाबा मला मदत करतो. शिरडीच्या गावात मी खराटा घेऊन साधुसंत येतील तेव्हा चारी वाटा झाडीन. बाभूळ होऊन त्यांचेवर तांदूळ फेकीन. माझ्या दु:खाचा भार शाईबाबाने नाहीसा केला आहे. त्यामुळे मी आनंदी आहे. मी शाईबाबाच्या काकड, आरतीला गेले. म्हाळीचे बाबा हे परम दैवत. तिच्या अशिक्षित रांगडी भाषेतून काव्य निर्माण झाले पण त्यातून काय बाहेर पडले? श्रीबाबांच्या सत्वशीलत्वा-बद्दलच्या, सत्यत्वाबद्दलच्या त्यांच्या पुराण पुरूषाबद्दलच्या इतकेच नव्हे तर त्यांच्या परमेश्वरी अवताराच्या व आजन्म ब्रम्हचारीत्वाबद्दलच्या व त्यांच्या उदात्त स्वरूपाच्या अमर कल्पना अर्थात त्या खऱ्याच. या म्हाळीचे प्रेम, भक्ती बाबा जाणून होते. जगाने वेडयात काढलेली, टाकलेली, चेष्टेचा विषय झालेली म्हाळी श्रीबाबांना फार प्रिय होती. श्रीरामाने जसे शबरीला प्रेमाने जवळ केले तसे श्रीबाबांनी म्हाळीला प्रेमाने कायम जवळ बाळगले. तिला आधार दिला तिचे रक्षण केले. तिच्याजवळ देण्यासारखे काय होते? एक शुद्ध भोळा भाव. तोच त्या शिरडीतला श्रीहरीला आवडला आणि प्रकाशाच्या झोतात नसलेले हे रानफूल त्याने आपल्या हृदयी धरले, प्रेमाने गोंजारले. म्हाळीचे जीवन श्रीबाबांच्या कृपेने कृतार्थ झाले.

# नवविधा भक्ती

—श्री. चंद्रकांत श्रीराम गरगटे,
३९९, गुरूवार पेठ,
सातारा—४१५ ००२.

० भक्ती म्हणजे ईश्वरावरील परम प्रेम होय. ईश्वराचा लाभ हेच मानवाचे सर्वोच्च ध्येय होय.

मानवी देह हा क्षणभंगुर आहे. अथांग जलामध्ये हेलकावे खाणाऱ्या लाकडाच्या ओंडक्याप्रमाणे आपण प्रवाहात वाहात जात असतो. सुख—दुःखांच्या भोगानंतर आपण आपल्या कर्माने लाटेच्या तडाख्याने दूर जाऊन शेवटी नाश पावतो.

याकरिता भक्ती हा अतिशय सोपा आणि सुलभ मार्ग आहे. यामुळे आपल्या आयुष्याचे सार्थक होते. ते आपण करून घेतले पाहिजे. याकरिता काया, वाचा, मने करून श्री साईपदी प्रेम करणे हा मनुष्यमात्रांचा खरा खरा स्वार्थ होय.

मन स्थिर केल्याशिवाय परमेश्वर प्राप्त होत नाही. मन स्थिर करण्याकरिता एकांतात बसून परमेश्वर प्रतिमेचे पायापासून ध्यान केले पाहिजे. यासाठी श्रद्धा हा अतिशय महत्वाचा भाग आहे. परमेश्वरांवर श्रद्धा ठेवून प्रयत्न करीत राहिल्यास श्रद्धा वाढत जाते.

परमेश्वरास ओळखणे हे भक्तजनाला अवघड नाही. भक्तजनांच्या गोड नादाने परमेश्वर आनंदाने डोलत असतो. यावेळी भक्त आपले सर्वस्व (तन, मन, धन) परमेश्वरचरणी समर्पण करीत असतो. त्यावेळी परमेश्वरास भक्तांकरिता धाव घेणे भागच पडते.

परंतु आजचा मानव हा अध्यात्माकडे न वळता भौतिक सुखाच्या पाठीमागे लागलेला आहे. पण हे सुख म्हणजे काय आहे? ते सुलभ मार्गाने कसे मिळविता येईल याचा विचार न करता तो दुःखाच्या खाईत पडतो.

सुख हे श्रावणातील पावसासारखं क्षणिक असतं.

सुखाचे दिवस हे कापरासारखे भुर्रकन जळून जातात व दुःखाचे दिवस हे ओल्या लाकडासारखे धुमसत राहतात.

(पान ४२ पहा)

# स्वामी श्रीराम बाबा

—श्री. गणपतराव सामंत एम. ए
व्यवस्थापक—श्रीमहालक्ष्मी मंदिर
मुंबई ४०० ०२६.



० **श्रीसाई सत्चरिताच्या तेवीसाव्या** अध्यायात एक घटना दिली आहे. एक योगाभ्यासी की ज्याने सर्व शास्त्रे व विशेषत: पातंजल योगशास्त्राचा अभ्यास केला आहे पण क्षणभर देखील समाधित जाता येत नाही व मन अस्थिर स्थितीत राहाते असा साधक आपल्या गुरूच्या आज्ञेने शिरडीस आला. त्याला

वाटले की याबद्दल आपणाला श्रीसाईबाबांकडून मार्गदर्शन मिळेल म्हणून तो मशिदीत गेला. श्रीसाईबाबा शिळी भाकरी कांद्याबरोबर खाताना पाहून आपणास बाबा काय मार्गदर्शन करणार असे त्या योग्यास वाटले.

विकल्प उठला त्याचे मनी। साई महाराज अंतर्ज्ञानी।
म्हणती 'नाना, कांदा ज्या पचनी। पडे तयानीच खावा तो।।
पचविण्याचा जोम व्हावा। त्याने कांदा खुशाल खावा।
ऐकून चरकला योगी जीवा। शरण सद्भावा तो गेला।।
असो पुढे तो योगाभ्यासी। बाबा येऊनी बैसता गादीसी।
निर्विकल्प अंतकरणासी। बाबापासी बैसले।।
पुसते झाले सावधान। पावोनि शंका समाधान।
लाहोनि उदी आर्शीवचन। प्रसन्नमन परतले।।

ही घटना २२ फेब्रुवारी १९१४ ची आहे. योग्याने प्रचिती आल्यावर साष्टांग दंडवत घातले. मशिदीत प्रवेश करताच श्रीसाईबाबांनी या योग्याला पाहून 'चले जाव कुत्ता' असे म्हटले. आपल्या सर्वज्ञ सामर्थ्याची योग्याला प्रचिती देऊन आशिर्वाद दिला.

असा हा थोर योगी म्हणजेच हल्लीचे स्वामी रामबाबा. या माहात्म्याचा जन्म २२ फेब्रुवारी १८६० साली झाला. श्रीसाईबाबांना पाहिलेल्या आज काही व्यक्ती हयात आहेत. पण स्वामी रामबाबा ज्यावेळी श्रीसाईच्या आठवणी सांगतात त्यावेळी श्रीसाई अवताराची खरी कल्पना येते. १३-८-८२ रोजी मी पहिल्या प्रथम स्वामी राम बाबांचे दर्शन घेतले व तेव्हांपासून अनेकदा मी त्यांच्या सहवासात असतो. हे सर्व क्षण, अनुभव व आनंद व्यक्त करण्या-साठी सर्व शब्द भांडार अपुरे पडेल.

स्वामी रामबाबांचे व्यक्तीमत्व उत्तुंग आहे. त्यांना पाहताच रविंद्रनाथ टागोरांची आठवण न येईल तरच नवल ! त्यांचे बोलणे सुरू झाले की, स्वामी विवेकानंदाची आठवण येते. वागणे, बोलणे एकदम शिस्तबद्ध कोणत्याही विषयावर प्रभुत्वाने बोलतात. त्यांचे बोलणे श्रीसाईबाबा, श्रीसाईसच्चरित किंवा सत्पुरुषाविषयी असते.

बोलणे सुरू झाले की ते दैवी वाटतेच. बोलताना मराठीतून, अस्खलित हिंदीतून किंवा उत्कृष्ट इंग्रजीमधून संभाषण करतात व त्याचवेळी ऐकणाऱ्याचे

आपल्या बोलण्याकडे लक्ष आहे किंवा नाही हेही अजमावतात. तुमच्याकडे त्यांची दृष्टी वळली की जणू ते तुमच्यातून आणखी कोठे पाहात आहेत असे वाटते पण त्यावेळी तुमचा 'क्ष' किरण त्यांनी घेतलेला असतो. मध्ये बोलणे त्यांना आवडत नाही व आपलीही तशी हिम्मत होणार नाही.

बोलणे सुरू झाले की, बहुतेकांच्या मनातील प्रश्नास ते वाचा फोडतील याचा मी अनेकदा अनुभव घेतला व घेत आहे. थोड्याशा सिद्धीने चमत्कार करणारे बाबा रामबाबांना आवडत नाहीत. गंगामाई, नर्मदा, गोदावरी या पवित्र नद्यांना ज्यांनी प्रदक्षिणा पूर्ण केल्या असतील तेच खरे संत व अशानांच श्रीसाईबाबा बोलवून आपली खूण पटवून आशिर्वाद देत असत, व याच श्रेणीतील स्वामी रामबाबा होत. श्रीसाईबाबांनी कोणालाच मंत्र दिला नाही पण हल्ली जिकडे तिकडे मंत्र देणारे 'बाबा' आहेत असे स्वामी सांगतात. स्वामींना ही गोष्ट पसंत नाही. वरील तिन्ही पवित्र नद्यांच्या प्रदक्षिणा केल्यावरच साधकास मंत्र मिळू शकतो. सद्गुरुपाशी गाठ पडते. मंत्र मिळो न मिळो श्रीसाईबाबांशी नेहमी संधान ठेवणे, आठवण करणे, स्मरण असणे म्हणजेच सर्व काही असे स्वामी सांगतात.

स्वतःचे अनुभव सांगताना ते 'मी' हा शब्द कटाक्षाने टाळतात. राम म्हणतो, रामला असे वाटते, राम उद्या येईल, रामला उद्या भेटा असा त्यांचा वाक्प्रचार असतो. स्वतःविषयी ते कधीच बोलत नाहीत. ईश्वर एकच आहे व तोच सर्वात व सर्वत्र आहे असे स्वामी सांगतात

साक्षात् ईश्वर म्हणजेच साई असे स्वामी प्रतिपादन करतात. हल्लीची ही स्फोटक परिस्थिती सुधारण्यासाठी प्रत्यक्ष साक्षात ईश्वरास म्हणजे साईस व स्वामी विवेकानंद सारख्या बृहस्पतीस भूतलावर परत जन्म घ्यावा लागेल.

श्रीसाईचरित्रातील तत्वज्ञान स्वामी रामबाबा अनेक उदाहरणे देऊन पटकन देतात. या ग्रंथाला ते सर्वश्रेष्ठ ग्रंथ मानतात. श्रीसाईसच्चरित ही श्रीसाईबाबांची जीवन गाथा आहे. त्यात काल्पनिक कथा नसून सर्व सत्य घटना आहेत. बाबांचे विचार, आचार, चमत्कार, शिकवण व उदी महिमा यामुळे हा ग्रंथ पवित्र झाला आहे. सर्व श्लोक गंगौघाप्रमाणे झेप घेतात. शब्दांच्या जुळवाजुळवीसाठी विचार थोपत नाहीत. स्वामी रामबाबा ज्यावेळी या ग्रंथावर बोलतात त्यावेळी त्यांचे साईबाबांवरील प्रेम व श्रद्धा स्पष्ट दिसून येते. त्याचप्रमाणे हल्ली बरेच

ग्रंथ बाबांवर लिहिले जात आहेत. त्यात नाटकी प्रसंग असतात. अशा ग्रंथांच्या किमती इतक्या भरमसाठ असतात की, त्या सर्वसाधारण भक्तांस परवडत नाहीत. हे पाहिल्यावर स्वामी रामबाबा व्यथित होतात व परखड भाषेत समाचार घेतात व म्हणतात जगात एकच देव तो म्हणजे "साई" व जगात एकच ग्रंथ व तो म्हणजे "श्रीसाईसच्चरित" स्वामी रामबाबांचे बोलणे नेहमी स्पष्ट व सत्य बोलताना तुमच्या भावनांचा ते विचार करीत नाहीत व सत्य नेहमी कटू असल्यामुळे ते समाचार घेतल्याशिवाय राहत नाहीत. अगोदरच समाज गरीब. त्यात वाढणारी महागाई, इतर बिकट समस्या यांनी समाज त्रस्त होत असताना श्रीसाईबाबांच्या नावावर नाटकी ग्रंथ लिहून ते जाहिरात बाजी करून भरमसाठ किमतीने विकणे लेखकाला लाञ्छनास्पद आहे. अशा परिस्थितीत फक्त श्रीसाईसतचरिताची पारायणे करणे इष्ट होय. त्यात सर्व आहे, या प्रासादिक ग्रंथाची निर्मिती बाबांच्या आशिर्वादाने व अनुमतीने झाली. म्हणून हा ग्रंथ साईभक्तांचा 'अमृतकुंभ' होय.

प्रत्येकामध्ये परमेश्वर आहे पण तो जागृत करणे हे भक्ताचे कर्तव्य आहे. त्या जागृतीसाठी ग्रंथपारायणे, हिमालयात जाणे, उपवास करणे, हटयोग यांची आवश्यकता नाही. आत्यंतिक तळमळ, सदा परमेश्वराचा ध्यास व आठवण यामुळे परमेश्वराची जाणीव होतेच, आपल्या सुप्त शक्ति जागृत होतात. जे काही करावयाचे ते मनःपूर्वक शारिरीक खटपट करून नव्हे.

मुल्ला होके बांग पुकारे तो क्या अल्ला सुनता है।
मुंगी के पावमें घुंगरू बजाये तोहि अल्ला सुनता है।

याच तत्वज्ञानाचा प्रचार स्वामी करतात, स्वतःच्या पायाला ते स्पर्श करू देत नाहीत. ते म्हणतात पाय धरावयाचे तर ते श्रीसाईबाबांचे, श्रीसाईबाबा होऊन गेले असे म्हणणे त्यांना पटत नाही तर श्रीसाईबाबा आपल्यातच वावरत आहेत असे ते सांगतात. याचा अनुभव अनेक साईभक्त आज घेत आहेत. श्रीसाईबाबांचा संचार चालूच आहेत व भक्तांच्या हाकेला ते धावून जातात याची असंख्य उदाहरणे आपण ऐकतो व वाचतो या व अशाच गोष्टीमुळे आज शिरडीस बारा महिने भक्तांची रीघ लागत आहे.

श्रीसाईबाबांची मूर्ति समाधिवर बसवली आहे त्यामुळे समाधिवर लोक चढतात हे त्यांना पटत नाही. समाधिवर मूर्ती बसविणे चुकीचे आहे त्यामुळे

सेवेकरी व भक्त समाधिवर चढतात, पाय देतात व अशा तऱ्हेने समाधि वारंवार अपवित्र होते. खरोखरच ही पटण्यासारखी गोष्ट आहे.

त्याचप्रमाणे बाबांच्या नांवावर आज जिकडे–तिकडे 'दरबार' स्थापन होत आहेत. अशा दरबारात व्यक्तिमहत्व वाढवण्याचे प्रयत्न चालू आहेत. अंगारे–धुपारे देणारे व प्रश्नांची उत्तरे सांगणारे, बाबांचा संचार झाला असे दर्शविणारे भक्तांत संभ्रम निर्माण करून श्रीसाईबाबांच्या नावास काळिमा फासत आहेत. श्रीसाईबाबांचा प्रचार झाला पाहिजे, मंदिरे स्थापन झाली पाहिजेत पण व्यक्तिमहत्व असता कामा नये. श्रीसाईबाबा आणि भक्त यांच्यात दलालाची आवश्यकता नाही. स्वत: भक्त श्रीसाईबाबांना साकडे घालू शकतो. असे स्वामींचे स्पष्ट विचार आहेत.

उपवास करून शरीर कष्टविणे म्हणजे उपवास नव्हे, तर 'वास' म्हणजे वासना 'उप' म्हणजे कमी आपल्या वासना कमी करणे म्हणजे उपवास हा मूळ अर्थ. श्री साईबाबा शारिरीक उपवासाच्या विरुद्ध होते हे भक्तांना ठाऊकच आहे. श्री रामबाबांचे तत्वज्ञान ही बौद्धिक कसरत नसून एक व्यावहारिक सर्वांस आचरता येणारा प्रयत्नवाद होय. संसारात राहून पण परमेश्वरावर विश्वासून मेहनत केल्यावर यश मिळणारच याची स्वामी ग्वाही देतात.

शिळ्या भाकरीबरोबर कांदा खाणारा आपणास काय उपदेश देणार हा गर्व निर्माण होताच श्रीसाईंनी स्वामींचे गर्वहरण केलेच. स्वामी रामबाबांच्या शब्दात 'माझा अहंपणा, मीपणा व गर्व धुळीस मिळाला' ज्योतित ज्योत मिळाली ज्योतिने अनेक ज्योति प्रज्वलित करता येतात. अशी ही श्रीसाईबाबांनी प्रज्वलित केलेली ज्योत 'स्वामी रामबाबा' आज अफाट प्रचारकार्य करीत आहेत. अत्याधु–निक सोईंनी सुसज्ज असलेले जगात दुसरा नंबर लागेल असे वीस मजली हॉस्पि–टल लवकरच या मुंबापुरीत गरीबांसाठी उभे राहात आहे. ही प्रेरणा व पुढाकार स्वामी रामबाबांचा.

कुठल्याच प्रकारची सिध्दी आपणास नको असे त्यांचे म्हणणे ........ अशा या ज्ञानियांच्या राजाने दि. २२. २. ८४ रोजी एकशे पंचविसाव्या वर्षात पदार्पण केले आहे. साईमय जीवन जगणाऱ्या अशा स्वामीरामबाबांची द्विशतकाची यशस्वी वाटचाल होवो ही श्रीसाईपदी नम्र प्रार्थना. जय साईराम.

# मशिदीतील पहिला रामजन्मोत्सव –

–श्री बाळकृष्ण अ. देसाई
१५१, भांगरवाडी, लोणावळा ४१०४०१

०जुने वर्ष मावळलं.नवं उजाडलं.पहाटे आंब्याच्या पानाआड लपून कोकिळा 'कुहू, कुहूऽऽ' चा ध्वनि काढू लागली. वसंतऋतु आल्याची जाणीव देत होती ती लोकांना. घरांच्या दारात गुढी नि मंगल तोरण शोभा देताहेत. शेतकऱ्यांना शेतात कामे नव्हती. फुरसत होती त्यांना.त्यामुळे स्त्री–पुरुष–मुलांत आनंद ओसंडून जात होता. वासंतिक हळदी कुंकवाचे समारंभ घरोघर चालू होते. अन इकडे शिरडीत मशिदीत प्रथमच रामजन्म साजरा करावा, असं काही साईभक्तांच्या मेळाव्यात चळवळ सुरू झाली.

ह्या श्रेष्ठ साईभक्तात काका महाजनी, गोपाळराव गुंड, माधवराव. तात्या–साहेब. अन् बाबांचे परमभक्त कृष्णशास्त्री भीष्म होते. अण्णासाहेब दाभोलकर गावा तून फिरून आले, तेव्हा त्याना सारा गाव दोन दिवसानी येणाऱ्या रामनवमीच्या आनंदात भारून गेल्याचं दिसून आलं.

बाबांच्या मशिदीत रामजन्मोत्सव प्रथम होणार आहे, म्हणून दूरदूरचे किती तरी लोक तो पाहायला आले होते. पण चालकांपुढे एक अडचण दत्त उभी राहिली. गावात मुस्लीम वसती फार होती. तशात मशिदीत राम जन्माला येणार तेव्हा दंगा झाल्याशिवाय राहाणार नाही,ही मोठी भीती. सरकारच्या लेखी परवा नगी शिवाय पाऊल उचलणं अशक्य. म्हणून पुढाऱ्यांनी अर्ज लिहून तो अहमद–नगरला कलेक्टरकडे पाठविला.

साईबाबा मोठे हिकमती. कोणतीही गोष्ट सहजासहजी झाली असं कधीच व्हायचं नाही. त्यात कुठून नि कसा तरी अडसर यायचाच. वरून उत्तर आलं "तशी परवानगी देता येत नाही."

मग काही प्रमुख व्यक्तींनी नगरला प्रत्यक्ष जाऊन कलेक्टर कचेरीत चौकशी केली,तेव्हा कळलं की बाबांचे भक्त म्हणविणारे कुळकर्णी याकामी आडवे आले आहेत अन् का तर दंगेधोपे होण्याच्या भीतीने. पण लोकांची चिकाटी दांडगी होती. त्यांनी गावातील सर्वांच्या सह्या मिळवून आम्हा हिंदु–मुस्लीमात एकी आहे,

भीतीचं कारण नाही,असा अर्ज लिहून ताबडतोब तो एका साईभक्ताबरोबर पाठवून दिला,अन् तीनचार मुस्लीम पुढाऱ्यांसह प्रमुख चालक मंडळी नगरला रवाना झाली. शेवटी परवानगी मिळाली,नि कार्यकर्त्यांना हुरूप चढला.

उरूस, जत्रा, मेळा म्हटला की, कुस्त्यांचा, फड, मिठाईची दुकानं, बैलगाड्यांच्या शर्यती इत्यादि गोष्टी आल्याच! मुसलमान मनात म्हणाले, बाबा आपलेच आहेत. ते मोठे चमत्कारिक नि हेकेखोर आहेत. बहुजन त्यांच्या मनाप्रमाणं वागतात, तर आपण आड जाणं इष्ट नाही. त्यांचा कोप व्हायचा नि आपलच नुकसान व्हायचं. अन् म्हणूनच साऱ्या रहिवाशांचं एकोप्याचं दृश्य निर्माण झालं.

रामनवमीचा दिवस उद्यावर आला. कृष्णशास्त्री भीष्मांनी पुढाकार घेतला. मला त्यांनी मशिदीकडे जात असता हाक मारली. मी गेली तीन चार वर्षे शिरडीला बाबांच्या दर्शनास चैत्रात फेरी टाकीत असे. त्यावेळी "अहो काकासाहेब, थांबा जरा!" अन् मी थांबताच त्यांनी आपल्या मनातील विचार मला सांगितला. उद्या आम्ही रामजन्माचा उत्सव मशिदीत साजरा करणार आहोत. तुम्हांला कसं काय वाटतं? कुणाची कसलीच आडकाठी येऊ नये, म्हणून चोख व्यवस्था केली आहे.हा पहा परवाना!

'अस्स! छान! पण एका अडचणीला तुम्हांला तोंड द्यावं लागणार आह!'

'कोणती ती?' भीष्मांनी विचारलं.

'बाबांची परवानगी प्रथम मिळाली पाहिजे. नि दुसरी गोष्ट कीर्तनासाठी हरिदास बुवा मिळविणं.'

त्यावर विचार न करता भीष्म तात्काळ म्हणाले," कीर्तनाला मी उभा राहीन! नि तुम्ही पेटीवर बसा. राधाकृष्णाबाई सूंठवडा करून द्यायला तयार आहेतच. त्यांचा उत्साह दांडगा. ताबडतोब त्या तयार होतील. तुम्ही बाबांच्या पुजेला निघालाच आहात. तेव्हा मीही तुमच्याबरोबर येतो. चला!'

काकांनी मशिदीत पाऊल टाकलं. नि बाबांच्या पुजेला सुरवात केली. तेव्हा बाबांनी विचारलं, 'काय चाललं होतं तुमचं वाड्यात?'

बाबांना काय उत्तर द्यावं, हे मला सुचेना. पुन्हा तोच प्रश्न भीष्मांना.

काय म्हणता? 'बोला एकदाचे! बोलाना, असे गुपचूप का?'

मग भीष्मांनी इतरांची नावं घेऊनच त्यांचा मनोदय बाबांच्या कानी घातला. बाबा शांतपणे म्हणाले, 'चांगलचं काम करताहात तुम्ही! करा की!'

बाबांची संमति मिळाली म्हणजे सर्व काम झालं, असं कधीच होत नसे. त्यात बाबा अडथळा आणीत, नि तेच ते कार्य उत्तमप्रकारे निभावून नेत. असं नेहमीच व्हायचं. माणसानं हुरळून न जाता सबुरीनं वागावं, हा त्यामागील त्यांचा हेतु असे. मी केलं असं होऊ नये.' कर्ता करविता वेगळाच असतो, हे प्रत्येकानं जाणलं पाहिजे. प्रेरणा त्यांची. कार्य करणारे आपण नि सिद्धीस नेणारा अखेर तोच.

मशिदीसमोर सभामंडप घातला. नवमी उजाडली. लोकांची चिक्कार गर्दी झाली. बाबा लेंडी बागेत गेले आहेत ही संधी साधून पाळणा आणून तो मंडपात छताला टांगला. फुलांच्या माळांनी तो सजविला. भीष्मांनी टाळ चिपळ्या घेतल्या नि कीर्तनाला सुरवात केली. मी पेटीवर बसलो. गुरुस्तवन चालू झालं. तेवढ्यात भीष्मांना बाबांचं बोलावणं आलं. 'असाल तसे तांबडतोब या!' दुसरा निरोप मला आला. निरोप्या म्हणाला, काका, 'तुम्हालाही बाबा बोलावताहेत!'

ह्या निरोपानं काकाच्या छातीत धस्स झालं. राधाकृष्णाबाईचा हात, खलबत्त्यात सुंठवडा कुटीत होता, तो तसाच वरच्यावर राहिला. त्यांचीही घाबरगुंडी उडाली.

निरोप ऐकताच आमच्या हातापायातील बळ नष्ट झालं. बाबांसमोर गेलो, नि हात जोडून उभे राहिलो.

बाबांची मूर्ति रागानं लाल झाली होती. आम्हाला पाहाताच ते खेकसून म्हणाले, 'कुणी बांधला तो पाळणा तिथं? नि कशासाठी?'

हात जोडून शांतपणे आम्ही म्हणालो, आपल्याच परवानगीनं आम्ही श्रीराम प्रभूचा जन्मसोहळा साजरा करीत आहोत. ते ऐकून घेऊन बाबा शांतपणे म्हणाले, 'बरं, बरं! अरे, कुणीतरी जाऊन दोन हार घेऊन या रे!'

बाबांचं बोलणं पुरं होण्यापूर्वीच मंडळीतल्या एकानं धावत जाऊन दोन सुंदर हार आणले नि बाबांपुढं ते ठेवले. त्यातला एक हार माझ्या गळ्यात घातला, नि दुसरा बुवांच्या गळ्यात घालण्यास मला सांगितलं.

कीर्तन झालं. रामजन्म झाला. सगळीकडे गुलाल उधळून लोकांनी सर्व परीसर लालेलाल करून टाकला. बाबांनाही लाललाल करून सोडलं. त्यानंतर एकाएकी झटका आल्यासारखं होऊन बाबा उठून पाळण्याकडे धावले. 'हा कुणी इथं टांगला? काढा! तांबडतोब इथून हलवा तो! काय गरज होती इथं तो टांगण्याची?'

बाबांचा हा रुद्रावतार पाहून राधाकृष्णाबाई घाबरून गेल्या. लोकांचा मागून आणलेला पाळणा आता काही त्याच्या घरी धड जात नाही. त्याची मोडतोड होणार! साऱ्या लोकांच्याही तोंडचं पाणी पळालं तेव्हा.

मी पाळणा सोडण्यासाठी पुढं सरकलो. तेव्हा बाबा, अधिकच कृद्ध होऊन म्हणाले," चल, हो बाजूला!'

आता काही पाळण्याची धडगत नाही दिसत, असंच लोकांना वाटलं. मी चूप बसलो. मग बाबांचा राग शांत होऊन म्हणाले, आताच तो सोडून कसं चालेल ? राहू दे तिथंच तो उद्यापर्यंत !' हे ऐकताच लोकांनी निःश्वास सोडला. त्यांच्या जीवात जीव आला.

त्यानंतर दुसऱ्या दिवशी गोपाळकाल्याचं कीर्तन झालं. बाबा पुढं होऊन म्हणाले, 'आता सोड तो पाळणा !'

त्यापुढं दरवर्षी मोठ्या थाटात नि उत्साहात रामजन्म साजरा होऊ लागला. हा इतिहास काका महाजनींच्या तोंडून ऐकत असता अंगावर काटा उभा राहत असे.

पुढल्या वर्षी रामनवमीला भीष्म नव्हते, म्हणून सिद्ध कवठ्याच्या बाळाभाऊ सातारकरांना कीर्तनकार म्हणून आणण्यात आले. त्यांच्या गावी महामारीची साथ होती. त्याला सांगण्यात आलं, चल शिरडीला नि कर बाबांची सेवा. तुझ्या गावातील साथ नाहीशी होईल.'

बाळाभाऊ आधुनिक तुकारामबुवा. त्यांनी उत्तम कीर्तन करून सर्वांना डोलायला लावलं. बाबांनी त्याला पाचशे रुपये बिदागी दिली. बाळाभाऊ एकदम खूश दिसले. त्यांना पाच वर्षांची बिदागी एकावेळी मिळाली. अन् त्यानंतर कीर्तनकार लाभले दासगणू. बाबांचे निष्ठावंत भक्त. बहुश्रुत, विनोदी, कल्पक नि कमालीचा बोलका. बाबांनीच त्यांना आपल्या पायापाशी आणलं, कीर्तनकार बनवलं नि फार मोठं केलं. असा हा रामजन्माचा इतिहास आजतागयत धडाक्यानं नि असंख्य भक्तांच्या साक्षीनं चालू आहे. जय श्री साईनाथ !

★

# महानसंत सद्‌गुरु दासकिसनबाबा व सद्‌गुरु दासकिसन साईबाबा मंडळ

—श्री. गोपाळ चंदीरामानी
२०१, व्ही. पी. पटेल रोड, गिरगांव मुं. ४.



**श्री कुशाभाऊ महाराज**

साईभक्त दासकिसनबाबा हे संतरत्न पुण्यात श्रावण वद्य अष्टमी शके १८२९ रात्रीं १२.०० वाजतां जन्माला आले. वडीलांचे नांव लक्ष्मणराव नाईक व आईचे नाव जमनाबाई. आईवडील प्रेमळ, शांत, परोपकारी, सात्विक प्रवृतिचे व ईश्वरभक्त होते. बाबांचे बाळपण अत्यंत कष्टप्रद, हालअपेष्टांत व दारिद्र्यात पार पडले. लहानपणीच त्यांचे वडील वारले, व त्यांच्या कुटुंबावर संकटांची मालीका सुरू झाली. अशावेळी त्यांच्या आईनी दारिद्र्याला कंटाळून, बाबा हे १५–२० दिवसांचे असताना

त्यांना कचऱ्याच्यापेटीत टाकले. परंतु त्याच मोहल्लातील एका मुसलमान 'चांदणी' नावाच्या बाईंनी ते मूल परत जमनाबाईच्या स्वाधीन केले.

बाबा हालअपेष्टांत दिवस काढीत असतांना हे कुटूंब दरमजल करीत औरंगाबादला आले. तेथे फकीराचा दर्गा होता. याच ठिकाणी फकीराच्या वेषांत साईबाबांनी दासकिसन बाबांना दर्शन दिले. त्यावेळी दारिद्र्यामुळें त्यांच्या अंगावर एकही चिंधी नसताना साईबाबांनी त्यांना कफनी दिली. व म्हणाले," खुदा सब आनंद बनायेगा. बच्चा. दो आनेका धंदा करो. पेट भरो और सेवामें रहना" या जबाबानुसार दोन आण्यावर धंदा करून दासकिसनबाबा ईश्वर सेवा करीत होते.

दासकिसनबाबांनी लहानपणी गुराख्याचे काम केले. तेथून ते मनमाडला आले. तेथे एका मुसलमान सुताराच्या हाताखाली नोकरी केली. त्यावेळी त्यांचे वय अवघे १३ वर्षाचे होते. इमानेइतबारे नोकरी करीत असतांना ईश्वराची सेवा ते अखंड करीत होते. पुढे ते पुण्याला आले. तेथे त्यांनी रेल्वेत सुताराच्या हाताखाली काम केले. त्याचवेळी त्यांनी तंतुवाद्याची कला अवगत केली. पुढे त्यांनी पुण्याला स्वतःचे दुकान थाटले. परंतु धंद्यातील चढाओढी व ईश्वर चिंतनामुळें धंद्याकडे दुर्लक्ष होऊ लागले त्यामुळें दुकान चालविणे कठीण झाले.

त्यानंतर पुणें म्युनिसिपालटी वर्क शॉपमध्ये मोटारी दुरुस्त करण्याचे काम करू लागले. त्यांत मैल्याच्याही गाड्या असत. परंतु त्यांनी कामामध्ये कुचराई केली नाही. ते नेहमी ईश्वर सेवेत वेळ घालवित असत. ते पहाटे चार वाजता उठून प्रातंविधी आटोपून स्नान करून औदूंबरांच्या झाडाखाली तीन तास नामस्मरण करीत. परत रात्री नऊच्या सुमारास पुन्हा स्नान करून औदूंबराच्या झाडाखाली रात्री १२वाजेपर्यंत नामस्मरण करीत. त्याचप्रमाणे सकाळ-संध्याकाळ मातेला नमस्कार करून तिचे दर्शन घेत असत. हे व्रत अखंड १२ वर्षे केले. तसेच प्रदोष व्रत त्यांनी त्यांच्या महानिर्वाणापर्यंत चालू ठेवले.

दासकिसन बाबांचे लग्न वयाच्या २२व्या वर्षी झाले. त्यांच्या पत्नीचे नांव राधाबाई होते. ती पत्नी शांत, विरक्त व ईश्वर भक्त होती. पुढे तिला मुलगी झाली. परंतु ती लवकरच मरण पावली. त्यानंतर थोड्याच महिन्यांत पत्नी राधाबाईचे निधन झाले बाबांना लग्नाची इच्छा नव्हती. परंतु त्यांच्या पायांत लग्नाची बेडी पडली. परंतु साईबाबांनी त्यांना संसारातून लवकरच मुक्त केले.

बाबांच्या पूर्वपुण्याईमुळे त्यांना साधुसंत व अवलियाचे दर्शन घडले. लहानपणी

आईबरोबर तीर्थक्षेत्रांना भेटी देतांना संत लोकांचे दर्शन झाले. त्यामधे प्रामुख्यान केडगावचे नारायण महाराज व गाडगेबाबा हे होत.

पत्नी राधाबाईचे निधन झाल्यानंतर दासकिसन बाबांची प्रकृति बिघडली, व काही विचारामुळें त्यांना जगणे कठीण झाले. त्यांचे मन विषण्ण झाले. मन उदास झाल्यामुळें त्यांच्या मनांत आत्महत्या करण्याचे विचार घोळू लागले. एके दिवशी त्यांनी अमीरासारखा पेहराव करून मुळामुठा नदीवरील लाकडी पुलावर जीव देण्यासाठी ते आले. परंतु तेथे आलीशाबाबांनी त्यांना रोखले. दासकिसन बाबांची विचारपूस करून त्यांची कानउघाडणी करून त्यांना आत्महत्येच्या विचारापासून परावृत्त केले. पुढे दासकिसन बाबांनी त्यांची सेवा केली, व आशीर्वाद मिळविला.

दासकिसन बाबांच्या गुरु भगिनी लक्ष्मीबाई ह्यांनी सदगुरु कृष्णनाथ उर्फ कुशाभाऊ मिरजकर ह्यांची व बाबांची गाठ घालून दिली. पहिल्याच भेटींत दृष्टादृष्ट झाल्यावर दासकिसन बाबांचे मन आकर्षित झाले व त्यांनी आपणांस अनुग्रह द्यावा अशी त्यांची इच्छा होती. ती इच्छा त्यांनी कुशाभाऊकडे प्रकट केली. प्रो.नारके यांच्या घरी दासकिसनबाबांना कुशाभाऊंनी गुरुमंत्र दिला. त्यानंतर लागोपाठ दोन दिवस गुरु दत्तात्रेय महाराज यांनी बालक रूपांत येऊन दासकिसन बाबांना त्यांच्या स्वस्थानी दर्शन दिले.

दासकिसनबाबा हे गुरु कुशाभाऊ यांच्याकडे आरतीला नेहमी जात असत. एके दिवशी कुशाभाऊंनी दासकिसनबाबांना साईबाबांच्या प्रतिमेपुढे बसवून त्यांना प्रत्यक्ष साईबाबांचे दर्शन घडविले. बाबांनी गुरुची सेवा केली. तसेच गुरुनी त्यांची कित्येक वेळा परीक्षा घेतल्या. परंतु दासकिसन बाबा नेहमी उत्तीर्ण होत गेले. गुरुची गाठभेट झाल्यावरसुद्धा बाबांची नोकरी चालू होती. परंतु एके दिवशी साईबाबांनी जबाब दिला की 'बच्चा अभितक काम किया तो किया. अभी दुनियामें चल.' या नंतर बाबांनी नोकरीला कायमचा रामराम ठोकला, व जनसेवेचे व्रत हाती घेतले. पुढे गुरुच्या सानिध्यांत वेळ घालू लागले. त्यानंतर कुशाभाऊ गुरुची प्रकृति ढासळली. अंत:काळी त्यांनी दासकिसन बाबांना जवळ बोलविले व त्यांनी अखेरचा उपदेश केला. "भक्तीचा ज्ञानदीप सतत जळू दे. आजपासून तुम्हांला सर्व रस्ते मोकळे आहेत. जाति, धर्माबद्दल कोणत्याही प्रकारचा भेदभाव मनात न बाळगता आपले जनसेवेचे कर्तव्य पार पाडा." यानंतर कुशाभाऊंची ज्योत दि. १९-२-१९४४ ला अनंतात विलीन झाली.



श्रीदासकिसनबाबा व त्यांचा दरबार

गुरूच्या निधनानंतर दासकिसनबाबांनी काही काळ पुण्यात वास्तव्य केले. नंतर मुंबईला प्रयाण केले. मुंबईच्या मुक्कामी प्रभादेवी, माझगांव येथे मंगळवारी व गुरूवारी आरती सुरू केली. त्यांच्या दर्शनाला बरेच भक्तमंडळी येत असत. काही कालावधी नंतर त्यांची गुरूभगिनी मंजुळाबाई यांच्याशी गाठ पडली. गुरूभगिनी मंजुळाबाईच्या विनंतीवरून दासकिसनबाबा गिरगाव या ठिकाणी स्थायिक झाले. मंजुळाबाईच्या आग्रहाखातर बाबांनी गिरगावात आरती सुरू केली. तेथेच त्यांनी जनसेवेचा अखंड झरा वाहत ठेविला. गुरूभगिनी मंजुळाबाई यांनी आपल्या निधनापूर्वी आपल्या दोन्ही कन्या म्हणजे दमयंती उर्फ ताईजी व पुष्पाजी यांचा सांभाळ करा असे वचन त्यांनी बाबांकडून घेतले होते. त्या वचनाला जागून त्यांनी १२वर्षे गिरगांव या स्थानी वास्तव्य करून येणाऱ्या प्रसंगांना अथवा संकटांना तोंड दिले.

गिरगावात आरती सुरू केल्यानंतर अनेक जातीचे व धर्माचे लोक जमू लागले दासकिसनबाबांनी सिद्धींना प्रसन्न करुन घेतले होते.या सिद्धीने अनेक प्रश्न सोडविले. संसारिकांना मार्गदर्शन केले. उपचार सांगितले व लोकोपयोगी कार्य सुरु केले. अशा रीतीने दासकिसनबाबा हे खरोखरच सत्पुरुष होते. या सतपुरुषांनी आपल्या जवळ आलेल्या भक्तमंडळीच्या व्याधि आपल्या अंगावर घेऊन त्यांना सुखी केले. बाबांनी अनेक चमत्कार केले व अनेकांचा उद्धार केला. कित्येकांना पुत्रप्राप्ती करुन दिली. अनेकांचे कल्याण केले. दासकिसन बाबांनी मुंबई, पुणे व पूलगावी आरती सुरू करून तेथे अनेक चमत्कार केले. त्यामुळे त्यांना मानणारा असा भक्तवर्ग अजूनहि आहे.त्यांनी केलेले चमत्कार येथे सगळे देणे अशक्य आहे.

दासकिसनबाबांनी गिरगाचाच्या जागेत गुरु पौर्णिमा, दसरा, रामनवमी, गोकुळ अष्टमी व दत्तजयंती हे उत्सव मोठ्या प्रमाणात सुरू केले. त्यावेळी अलोट भक्तगणांची गर्दी होत असे. दासकिसनबाबांचे शिक्षण इन्फटपर्यंतच झाले. परंतु त्यांनी "साईस्तवन मंजरी" हे पुस्तक लिहून छापले. यातील साई पदे वाचल्यावर आपणांस कळून येईल की त्यांच्या ठिकाणी किती अगाधज्ञान व साईबाबांवरील, श्रद्धा, भाव व भक्ति पदोपदी दिसून येते.

दासकिसनबाबाचे गिरगावातील १२ वर्षाच्या वास्तव्यानंतर त्यांना आपला अंतिम काळ जवळ आल्याची जाणीव झाली. त्यांनी भक्तमंडळीच्या गाठीभेटी घेऊन त्यांना आपण फार दूर जाणार आहोत, मी पुन्हा मुंबईला येणार नाही. अशी ग्वाही दिली. परंतु भक्तमंडळीना त्यांच्या बोलण्याचा अर्थ न समजल्यामुळे त्यांच्या निर्वाणा नंतर भक्तवर्ग अखेरीस दुःखी झाला. बाबांनी निर्वाणाच्या अगोदर २१ दिवस पुण्याला वास्तव्य केले. त्याठिकाणी वरील मुदतीत त्यांनी आपले राहिलेले अपुरे कार्य पूर्ण करून घेतले. यानंतर दिनांक १४–१२–६१ रोजी पहाटे पुण्याला दासकिसन बाबांनी देह ठेविला.

दासकिसन बाबांनी आपला देह ठेविला यावर भक्तमंडळींचा विश्वास बसेना. परंतु ज्या भक्तांनी त्यांचे चमत्कार पाहीले ते धन्य होत. दासकिसबाबांच्या महा निर्वाणामुळे भक्तमंडळीवर बांका प्रसंग उभा राहीला. ज्याला त्याला वाटे आपल्याच कुटूंबातील कर्ता पुरुष निघून गेला आहे. परंतु दासकिसन बाबांनी आपल्या मानस कन्या दमयंती उर्फ ताईजी यांना जबाब दिला होता की, "मी जरी गेलो तरी माझ्या मागे माझी हाडे तुझ्याबरोबर कामे करतील". भक्तगणापासून बाबा शरीराने गेले तरी सर्व भक्तगणांना बाबा आपल्या जवळच आहेत असा अनुभव नेहमी येत होता.

भक्तगणापैकी एक सिंधी गृहस्थ कै. गोविंदजी कृपलानी यांनी गिरगावातील ह्या स्थानाला दमयंती ताईच्या हाती आरतीचे तबक देऊन परत आरती सुरू केली. आजही ही आरती व भजन नित्य नियमाने दरगुरूवारी रात्री ८॥ते ११॥ वाजेपर्यंत चालू असते.

दासकिसबाबांच्या महानिर्वाणानंतर दमयंती उर्फ ताईजी ह्या सद्गुरु दासकिसन साईबाबा मंडळाची धुरा वाहत आहेत. साई भक्तीची पालखी आपल्या खांद्यावर घेऊन साईपताका फडकविण्याचे काम करीत आहेत. ताईजी म्हणजे एक चालते बोलते नवचैतन्य. भजन संपताच डोळे मिटतात. प्रत्येक भक्तांने विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देऊन त्यावरील उपचार सांगितले जातात. तसेच आपल्या मंडळातील भक्त वाईट मार्गांनी जात असेल तर त्याला जाणीव करून देतात. त्यांना योग्य ते मार्गदर्शन करतात. ताईजींना भक्तगणाच्या उद्धाराची तसेच भक्तांच्या सुःखाचा ध्यास लागलेला आहे. भजनानंतर सगळ्या भक्तांच्या प्रश्नांची उत्तरे दिली जातात. ही उत्तरे फक्त मुंबईतील भक्तांची नसून, स्पेन, मॅनिला, सिंगापूर, व हॉंगकॉंग येथील विखुरलेल्या भक्तांची श्रीं. गोपाल चंदीरामानी यांना फोन अथवा पत्र लिहून आपल्या अडी–अडचणी दरबारांत विचारण्यास ते सांगतात व त्यांच्याही प्रश्नाची उत्तरे दिली जातात.

ताईजींनी दासकिसनबाबांच्या निर्वाणानंतरसुद्धां फार मोठा भक्तवर्ग निर्माण केलेला आहे. या सर्व भक्तगणांना साईभक्तीची ओढ त्यांनी निर्माण केलेली आहे. या भक्तगणांमध्ये अठरा पगड जातींचे व धर्माचे लोक आहेत. ह्या सर्वांशी त्या प्रेमाने, आपुलकीने वागतात. परमपूज्य दासकिसनबाबा जरी आज आपल्यामध्ये नाहीत तरी सुद्धां त्यांचा वारसा लाभलेल्या ताईजी बाबांना वाट पूसत व त्यांच्या मागोमाग पाऊल ठेवून साईभक्ताचा वटवृक्ष पसरविण्याचा प्रयत्न करीत आहेत.

आज ताईजींच्या मार्गदर्शनाखाली सद्गुरू दासकिसन साईबाबा मंडळ गिरगावांतील जागेत रामनवमी, गुरू पौर्णिमा, गोकुळ अष्टमी, दसरा व दासकिसनबाबा निर्वाण दिन हे उत्सव साजरे करीत आहेत. दासकिसनबाबा हे हयात असतांना ताईजींच्या समोर त्यांनी दोन बड्या आसामीच्या पुढे असे सांगितले की, "मला कोणी उठ म्हणणार नाही अशी वीतभर जागा द्या." त्यांची इच्छा त्यांच्या हयातीत पूर्ण होऊ शकली नाही. परंतू नुकताच सदगुरू दासकिसन साईबाबा मंडळीने मालाड येथे साईबाबा मंदिर बांधण्याचा संकल्प केलेला आहे. त्याप्रमाणे परमपूज्य ताईजींच्या

मार्गदर्शनाखाली मंदिराच्या बांधकामाचे काम सुरू होऊन १।२ काम पूर्ण झालेले आहे. अशा रीतीने दासकिसनबाबांची इच्छा कांही काळानी साईकृपेने पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे.

दासकिसन साईबाबा मंडळ हे परमपूज्य ताईजींच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत झाले असून मंडळाचे अध्यक्ष श्री. गोपाल सी. चंदीरामानी (फेविरट फॅब्रिक्सचे मालक) हे तनमनधन अर्पण करून आपला अमोल वेळ मंदिराच्या बांधकामाकरिता खर्च करीत आहेत. अध्यक्ष आपल्या मंडळाला सर्वतोपरी साहाय्य करीत आहेत.

# जय जय श्री रघुनाथ समर्थ

**********************

—श्री. मधुसूदन वामन करंबेळकर
रघुनाथ निवास चेंबूर गावठाण मुम्बई–४०००७१.

आराम: कल्पवृक्षाणां, विराम: सकलापदाम
अभिरामस्त्रिलोकानां, राम: श्रीमान स न: प्रभु:

(श्रीराम हा कल्पवृक्षांचा जणू सुंदर बगीचाच आहे. सर्व आपत्ति घालविणारा व त्रैलोक्यात मनोहर असा तो राम आमचा प्रभू आहे (श्रीराम रक्षा श्लोक १६)

उभा कल्पवृक्षातळीं दुःख वाहे।
तया अंतरी सर्वदा तेंचि आहे॥
जनीं सज्जनी वाद हा वाढवावा।
पुढे मागुता शोक जीवीं धरावा॥ (६१ वा श्लोक व मनाचा)

वरील दोन्ही श्लोकावरून हाच अर्थ निघतो कीं, श्रीराम हा सर्व आपत्ती घालविणारा व सर्व सुख प्राप्ती करून देणारा आहे. असा जो महान कल्पवृक्षांचा

कल्पवृक्ष श्रीराम त्याच्या छायेत उभा असूनहि माणूस जर दुःख करीत बसेल तर त्या हत भाग्याच्या अंतरी सर्वकाळ तें दुःखच भरून राहील.जनांत लौकिकात व सज्जनांच्या समोरहि हा दुःख वाद वाढवीत गेल्यास जीवनांत पुढे मागे, सर्व बाजूने, शोक करीत बसावे लागेल. सदा सर्वकाळ श्रीराम हा आपले हृदयांत असून त्याची व आपली अखंडीत अशीच भेट असते. म्हणून आपण जे जे कांही चांगले वाईट करीत आहोत ते तो सर्वदा आपले जवळ राहून बघत आहे. त्याचा जाब हा त्याला द्यावा लागणारच आहे हे निश्चित समजून असावे.श्रीराम हा 'मर्यादा पुरुषोत्तम' म्हणून प्रसिद्ध आहे. श्रीरामाचे आचार धर्माला तोड नाही. चांगल्या गोष्टींचाच तो भोक्ता आहे म्हणून नित्य चांगल्या गोष्टी, चांगल्या योजना उराशी बाळगून ठेवाव्यात. श्रीराम हा नित्य आपले जवळ असल्यामुळे त्या कल्पवृक्षाचे छायेत त्या गोष्टी ते संकल्प सिद्ध होतात. नित्य दुःखाचे चिंतन केल्याने किंवा आपल्या दारीद्रयाचा विचार करीत बसल्याने ते विचार बाह्यमनांतून आंतर मनांत म्हणजेच श्रीरामाजवळ पक्के होतात व पर्यायाने परिस्थिती खालावत जाऊन कशांतही आनंद वाटत नाही. जीवन नकोसे होते. यापेक्षा श्रीराम माझे जवळ नित्य आहे. मी चांगले प्रयत्न करीन, माझे हातून दान धर्म व्हावा, गोरगरीबांची सेवा घडावी, यत्न तो देव जाणावा हा विचार पक्का मनाशी धरून मी दिर्घोद्योग करीन अशी धारणा धरल्यास त्याला श्रीराम मदतीचा हात दाखवितो व त्याला सहाय्यभूत होतो.

ज्याचे आपण नित्य चिंतन करतो तदाकार तो होत असतो असा एक सिद्धांत आहे. अळीला भ्रमराचा ध्यास लागल्यामुळे काही काळांत अळी भ्रमर रूप होते. संतांनी नित्य श्रीराम चिंतन केल्यामुळे ते रामरूपच झाले. श्रीरामाला अशा संतांची पूजा आपल्या पूजेहूनही फार श्रेष्ठ वाटते. बिभिषणाला सांगताना श्रीराम म्हणतात 'अतः सुग्रीव मुख्यांस्त्वं पूजयाशु विशेषतः । पूजितेषु कपीन्द्रेषु पूजितो ऽहं न संशयः'

अर्थ – म्हणून तू विशेषतः सुग्रीवादी वानरांचा सत्कार सत्वर कर. वानर श्रेष्ठांचा सत्कार केलास म्हणजेच माझा सत्कार केलास ह्यांत संशय नाही.

श्रीसाईबाबा हे रामभक्त होते. रामावर त्यांची नितांत श्रद्धा होती. श्रीराम कृपेने साईबाबा रामच झालेले होते. कांहीच्या म्हणण्याने असेही असेल कीं श्रीराम हाच साईरूपाने आला असेल व म्हणूनच श्री साईराम असा राम मंत्र तयार झाला काहीही असो परंतु श्रीसाईची रामावर नितांत श्रद्धा होती. त्यांनी आपले महानिर्वाणापूर्वी श्रीरामायणाचे पाठ करून घेतले होते. 'श्रीराम जन्मोत्सव' त्यांनीच शिर्डीत

सुरू केला व तो आजतागायत सुरू आहे. श्रीरामांनी, वानर, भिल्ल, स्त्रिया, पुरुष, खारकुंडी, अस्वल, वृक्ष, धोंडे, गरीब, श्रीमंत, विद्वान, अज्ञानी, राक्षस, बिभिषण, सर्व तऱ्हेच्या गोष्टींवर सारखे प्रेम केले. एका कुत्र्याची (सारमेय) तक्रार कोर्टांत म्हणजेच दरबारात चालवून त्याला न्याय दिला. श्री साईनाथांनीही डुकरे, कुत्रे, माणसे, विट, गरीब, श्रीमंत वगैरे सर्व थरांचे बाबतींत सारखेच प्रेम केले. श्रीरामाला अशा आपले भक्ताचाच--उत्सव अधिक प्रिय वाटतो म्हणून आज भारतातच नव्हे तर सर्व जगभर साईचा दरबार भरत चालला आहे. रामांनीही आपले नांव साईचे मागे घेऊन श्रीसाईना मोठेपणा दिला आहे. 'साईराम' ह्यावरून श्रीरामांचे भक्तावर किती प्रेम आहे हे सहज कळून येईल.ज्या ज्या मंगलगोष्टी दिसतात त्याला मंगलत्व देणारा हा 'श्रीराम' आहे. ज्यांत राम नाही ती गोष्ट टाकाऊ होते. श्रीरामाचा अवतार दुष्टांचा नाश व सज्जनांचा प्रतीपाल, धर्माचे रक्षण करण्याकरिता झाला. तोच राम कलीयुगामध्ये (सः आई=साई) सर्व जगावर मातृवत प्रेम करण्याकरीता आला.आपण जीवनांत त्रास भोगून जगाला आनंद दिला व आजही सर्वांना मातृवत हाकेला 'ओ' देतो अशा श्री साईरामाला माझे अनंत प्रणाम. जय साईबाबा जय साईराम, मुखांत राहो सदा तव नाम.

❖ ❖ ❖

(पान २४ वरून)

याकरिता ईश्वराशी मीलन हेच खरे अंतिम सुख आहे. संकट-दुःख ही ढगाप्रमाणे येतात आणि जातात. ती काही कायम स्वरूपाची नसतात. आपण आपले कार्य करीत असतांना ते जिद्दीने व चिकाटीने केले पाहिजे, परमेश्वर आपल्या कार्याच्या पाठीमागे सदैव असतो. म्हणून प्रत्येकाने परमेश्वराची उपासना केली पाहिजे. उपासना म्हणजे काय?

"उपासना म्हणजे आपले अस्तित्व ईश्वराच्या अस्तित्वात मिळविणे आणि भक्तीचा आनंद मिळविणे."

ईश्वर निर्गुण आणि निराकार आहे. परंतु जेव्हा जरूर पडते तेव्हा तो आत्ममायेच्या योगाने शरीर धारण करून अवतार घेतो. मानवांमध्ये तो मानवाप्रमाणे वावरतो, परंतु काही वेळा आपले अवतारित्व निदर्शनास आणण्याकरिता तो चमत्कार आणि अलौकिक कृत्ये करून लोकांचे मन आपल्याकडे वेधून घेतो.

म्हणून प्रत्येक मानवाने आपल्या सुसंस्कृत हृदयात ईश्वरनामाची स्थापना केली पाहिजे. त्याला प्रेमरूपी पाणी घालून त्याच्या सभोवतार शिस्तीचे

कुंपण घालून त्याचे संरक्षण केले पाहिजे. म्हणजे तो वाढेल, फुलेल आणि आनंदरूपी फळ देईल.

श्री साईबाबांनी शिरडीमध्ये वास्तव्य करून तेथील लोकांमध्ये व तेथे येणाऱ्या भाविक भक्तांच्या हृदयात भक्तीचे व ईश्वरी उपासनेचे जे बीज रूजवून ठेवले आहे त्याचा कालांतराने भव्य वृक्ष झाल्याचा दिव्य चमत्कार आज आपणांस शिरडी येथे पहावयास मिळत आहे.

जप, ध्यान आणि सेवासाधना यातून ईश्वराविषयी प्रेम निर्माण होते. याकरिता प्रत्येक भक्ताने आपली भक्ती निस्वार्थी, निपक्ष, निर्हेतूक अशा प्रकारे केली पाहिजे. परमेश्वराची आराधना ही शिदोरी असून ती जन्मभर पुरून उरणारी आहे.

नवविधा भक्ती म्हणजे काय?

भक्तीचे एकूण नऊ प्रकार शास्त्र ग्रंथांमध्ये सांगितलेले आहेत. त्यालाच नवविधा भक्ती म्हणून संबोधले आहे. भक्तीचे हे नऊ प्रकार खालीलप्रमाणे आहेत.—

| | | |
|---|---|---|
| (१) श्रवण भक्ती | (२) किर्तन भक्ती | (३) नामस्मरण भक्ती |
| (४) पादसेवन भक्ती | (५) अर्चन भक्ती | (६) वंदन भक्ती |
| (७) दास्य भक्ती | (८) सख्य भक्ती | (९) आत्मनिवेदन भक्ती |

वरील नऊ प्रकारच्या भक्तींची थोडक्यात माहिती पाहू.

(१) **श्रवण भक्ती** : श्रवण भक्ती म्हणजे हरिकथा, पुराण व अध्यात्म निरूपण ऐकणे होय.

यांमध्ये व्रते, तीर्थ, दानधर्म इ.चे महिमे ऐकणे तसेच अनेक तीर्थस्थाने, तेथील महात्म्य, अनेक मंत्र-जप किंवा साधना किंवा तप करण्याचे प्रकार ऐकणे.

(२) **किर्तन भक्ती** : किर्तन भक्ती म्हणजे परमेश्वराची कथा करावी. आपल्या वाणीमधून परमेश्वर गुण यथार्थ गात रहावे.

यामध्ये किर्तन साहित्य संपादन करावे. याकरिता हरिकिर्तनाची मनापासून आवड धरावी. त्याबद्दल आपणास अत्यंत गोडी आणि उत्कंठा असावी. किर्तन हे परमेश्वराला आवडते. किर्तनाने श्रोता, वक्ता, आणि परमेश्वराचे समाधान होते. किर्तनाने वाणी पवित्र होते. किर्तनाचा महिमा अगाध आहे.

श्रवण भक्ती आणि किर्तन भक्ती या दोन्ही प्रकारास दम असे संबोधले जाते.

(३) **नामस्मरण भक्ती** : परमेश्वराच्या स्वरूपाचे स्मरण करावे. त्याचे नाम अखंड गावे, आणि त्यामुळे समाधान प्राप्त करून घ्यावे. ही नामस्मरण भक्ती होय.

यामध्ये नामस्मरणाचा नित्यनेम महत्वाचा भाग आहे. परमेश्वराच्या, नामस्मरणाने संकटे व विघ्ने नाहीशी होतात. परमेश्वर संकटसमयी भक्तांचा सांभाळ करण्याकरिता भक्ताच्या पाठीशी उभा राहतो. नामस्मरणाचा महिमा अगाध आहे.

नामस्मरण भक्तीस शम असे संबोधले जाते.

(४) **पादसेवन भक्ती** : काया, वाचा, मने करून मोक्ष प्राप्तीसाठी सदगुरूंची चरणसेवा करणे म्हणजेच पादसेवन भक्ती होय.

जन्ममरणाची यातायात चुकविण्यासाठी सद्गुरू चरणी अनन्यभाव ठेवणे ह्याचेच नाव पादसेवन भक्ती होय. कारण संसार सागरातून तरून जाण्यासाठी सद्गुरूंच्या कृपेशिवाय दुसरा अन्य उपाय नाही. याकरिता सदगुरू चरणसेवा हाच सर्वात साधा आणि सोपा मार्ग आहे.

सद्गुरू वाचून सन्मार्ग मिळत नाही. म्हणून हा सन्मार्ग (ज्ञानमार्ग) कळण्याकरिता संतसंगती धरणे आवश्यक आहे.

पादसेवन भक्तीस उपरम असे संबोधले आहे.

(५) **अर्चन भक्ती** : अर्चन म्हणजे देवदेवतांची पूजा होय. ही पूजा शास्त्रामध्ये सांगितलेल्या पद्धतीने केली पाहिजे.

याकरिता प्रत्येकाने देह, वाणी, मन, चित्त, द्रव्य, जीव, प्राण ह्यांनी उत्तमप्रकारे भावनापूर्वक परमेश्वराचे पूजन करणे म्हणजेच अर्चन भक्ती होय.

(६) **वंदन भक्ती** : देव, साधू, संत, सज्जन, यांना नमस्कार करणे. ही वंदन भक्ती होय.

नमस्कारामुळे लीनपणा अंगी येतो. यामुळे सज्जनांशी व साधुसंताशी सख्य होते. यामुळे चित्ताचे दोष नाहीसे होऊन घडलेल्या अन्यायांची क्षमा होते. नमस्कारामुळे गुरूदेव ह्यांची कृपा व प्रसन्नता वाढत जाते.

अर्चन भक्ती व वंदन भक्ती यांना तितिक्षा असे संबोधले जाते.

(७) **दास्य भक्ती** : सदा सर्वदा देवद्वारा सन्निध राहून जे जे कार्य पडेल ते ते करीत राहणे, म्हणजे दास्य भक्ती होय.

याकरिता जी जी कामे वाटणीस येतील ती तत्परतेने करण्यास पुढे यावे. आपला मोठेपणा विसरून सर्व प्रकारचे दास्यत्व पत्करावे.

यामध्ये सर्वांची अंतःकरणे समाधान पावण्यासाठी करुणायुक्त व स्तुतीपर भाषण करावे.

(८) **सख्य भक्ती** : सख्य भक्तीमध्ये परमेश्वराशी अत्यंत सख्य असे करावे की, त्याला प्रेमसूत्राने बांधून टाकावे. देवास जे आवडत असेल तसेच आपण वागल्यास देवाशी सख्य होईल.

याकरिता भक्ती, भाव, भजन, कथा, किर्तन इ. गोष्टी परमेश्वरास आवडत असतात.

एकनिष्ठपणाने मनापासून व अंतःकरणापासून परमेश्वराशी सख्य केल्यास प्रत्यक्ष परमेश्वर आपणास मिळतो. परमेश्वर अनाथांचा, पतितांचा वाली आहे. तो कृपेचा सागर आहे. तो करूणेचा मेघ आहे.

दास्य भक्ती व सख्य भक्ती यांना श्रद्धा असे संबोधले आहे.

(९) **आत्म निवेदन भक्ती** :

यामध्ये सर्वत्र एक आत्माच आनंदरूप आहे. परमात्माही एकच आहे. आत्मा निर्गुण व निरंजन (मायारहीत) आहे. आत्म्याचे पूर्णत्व सर्वत्र परिपूर्ण असे भरलेले आहे.

आपण मिथ्या असून परमेश्वर खरा आहे, आणि देवभक्त दोघेही एकरूप आहोत. ह्या वचनाचे रहस्य जे जाणतील त्यास आत्मनिवेदन म्हणतात

या नवविधा भक्तीमध्ये आत्मनिवेदन ही भक्ती अतिशय महत्वाची व मुख्य होय.

आत्मनिवेदन भक्तीस समाधान असे संबोधले आहे.

अशी ही नवविधा भक्ती केल्याने सायुज्यतामुक्ती मिळते. भक्ती करीत असताना गुरू असणे हा महत्वाचा भाग आहे. परमेश्वराविषयी जो ज्ञान शिकवितो तोच खऱ्या अर्थाने गुरू शोभतो. खरे गुरू तेच की, जे जीवनाचे खरे उद्देश कोणते ? आणि ते कसे साध्य करावे याबाबत मार्गदर्शन करतात.

गुहेत हजारो वर्षांचा अंधार जरी असला तरी दिवा जसा त्याला हद्दपार करतो त्याप्रमाणे गुरू बोध हा अनेक जन्मातील संस्काररूपी अंधार नाहीसा करून मलीन हृदयाला निर्मळ करतो.

कळीपणातून मुक्त झाल्यावर फुलांतून सुवास बाहेर पडतो, आणि तो जसा आसपासच्या लोकांना आल्हाद देतो त्याप्रमाणे अज्ञानाचा परिपूर्ण नाश झाल्यावर सिद्ध पुरूषांचे दिव्य सामर्थ्य प्रगट होऊ लागते. त्यायोगे त्यांच्या

सहवासात आलेल्या माणसांची चिंता, उद्वेग, पाप, ताप, दु:ख-दैन्य, संकटादी, दूरितें नाश पावतात.

श्री साईबाबांनी आपल्या भक्तांना उपदेश केला तो असा,

"माझ्यावर जो निरपेक्ष भावाने आणि हृदयाच्या तळमळीने प्रेम करील त्यालाच माझ्या खऱ्या आणि सत्य स्वरूपाची ओळख पटेल. माझ्याशिवाय सारे जग त्याला शून्य दिसेल. माझ्या ठिकाणी आपल्या सर्व मनोविकासांचा होम करणाऱ्या व्यक्तिला मी या जन्मातच नव्हे तर जन्मोजन्मी कधीही अंतर देणार नाही. मी माझी स्वत:ची शक्ती दयाधन परमेश्वराकडे खर्च करून माझ्या भक्तांच्या उपकारांची शक्य ती फेड करीन."

जे बीज पेरले ते उगवायचे आणि एक बीज पेरले असता त्याचा मोबदला अनेक पटीत मिळवायचा, हा ईश्वरी न्याय सर्वत्र दिसून येतो. करिता सुखेच्छूने ते पेरतेवेळीच सुपीक हाती लागण्यासारखेच पेरले पाहिजे. तेव्हा आपण श्री साईचरणी सर्वांनी प्रार्थना करू या. हे साईनाथा, रानात चरत असलेली गाय जशी आपल्या वासरासाठी धावून येते आणि त्याला दूध पाजून तृप्त करते त्याप्रमाणे हे अनंता माझ्या सर्व साई भक्तांसाठी तू सत्वर धावून ये आणि एकवार प्रेमामृत पाजून आम्हां सर्वांना तृप्त कर.

हे साईनाथा, तुझ्या चरणकमलावर माझे मस्तक टेकू दे. हे साईनाथा तुझ्या प्रेमाने माझे हृदय भरून वाहू दे आणि त्या प्रेमाच्या योगे चिंतेने होरपळणाऱ्या जीवांचे दु:ख पार नाहीसे होऊ दे.

॥ श्री साई चरणी कोटी कोटी प्रणाम ॥

★

# श्री साईराम मीलन महायज्ञ–

–डॉ. अनिल जायस्वाल
साई क्लिनिक, चितार ओळ, नागपूर–२.

साईंचि आम्हां परब्रम्ह।
साईंचि आमुचा परमार्थ परम।
साईंचि श्रीकृष्ण श्रीराम।
निजाराम श्रीसाई॥६५॥

–(अध्याय ४–श्री साईसच्चरित)

वाचकहो, श्री रामचंद्र प्रभंची छबी आपण अनेकदा पाहतो. प्रत्येक छबींत धनुष्य-बाण त्यांच्या सोबतच असतो. धनुष्यबाणाशिवाय श्री रामाचें दर्शन कधीच होत नाही. मग ते राज्यासनावर आरूढ असोत वा सीतामाते-बरोबर वनवासात असोत. सदा सर्वदा धनुष्यबाण बाळगलेले दिसतात.

उपनिषदामध्ये उल्लेखित केल्या गेल्याप्रमाणे,

'प्रणवो हि धनुः'

–धनुष्यास ओमकाराची उपमा दिली गेलेली आहे. ओमकार अर्थात ज्ञान. ज्ञानच धनुष्य आहे. धनुष्य हे ज्ञानाचे स्वरूप आहे.

बाण हे विवेक स्वरूप आहे.

ज्याप्रमाणे श्रीराम धनुष्य-बाणाने सदैव सुसज्ज दिसतात. त्याचप्रमाणे आपणसुद्धा ज्ञान आणि विवेकाद्वारे सुसज्ज असावयास पाहिजे. परंतु भक्ती-मार्गावर अग्रेसर होण्यास जास्त ज्ञानही नको किंवा केवळ अज्ञानही असावयास नको.

मध्यम वर्गाच्या ज्ञान व विवेकाद्वारेच मानव-प्राणी भक्तीमार्गाचे अवलंबन करू शकतो.

इतरां न साधे जें बहु सायासें।
तेंच साधील तो अल्पायासें।
जो दृढ धरी त्या सद्‌गुरूचे कासे।
तया प्रकाशे सद्विद्या॥१२४॥

–(अध्याय १६–श्री साईचरित्र')

आणि पुढील ज्ञान व विवेक अर्थात सद्विद्या भक्तास आपोआपच उपजत असते.

न जाणों कामरूपी दैत्य केव्हा विघ्न टाकेल. कामरूपी दैत्य आपल्या प्रत्येकाचे मागे सारखा धावत आहे. जसजसें भक्तीमार्गावर आपण अग्रेसर होतो तसतसें हा कामरूपी दैत्य अधिकाधिक छळत असतो. शेवटी परावृत्त करून हाच आपणांस भक्ती मार्गापासून विमुख करतो. ज्ञान व विवेक जवळ बाळगल्यास हा कामरूपी दैत्य परावृत्त होतो. मग तो आपल्याजवळ फटकण्याचे धाडसही करीत नाही. जर कदाचित केले तरी ज्ञान व विवेकाद्वारे तो पराजित होतो.

काम, लोभ, दंभ, क्रोध, मोह-माया आदी सर्व दैत्यच आहेत. हे 'सहा' मानव-धर्माचे शत्रु आहेत. म्हणूनच या सर्वांस आपण 'षड-रिपु' असे म्हणतो. ज्याच्या डोळ्यांत पाप आहे तोच दैत्य आहे. प्रतिक्षण जो जागरूक असतो त्याचें हे दैत्य काहीच बिगडवू शकत नाहीत.

श्री रामचंद्र प्रभुचे स्वरूप अद्‌भुत आहे. दैत्यकुळांतील शूर्पणखेच्या मनांत श्रीरामाबद्दल ओढ निर्माण झाली. परिणामस्वरूपच तिने श्रीरामास पतिस्वरूपांत प्राप्त करण्याचे धाडस केले. आपले हृदयतर या दैत्य-स्त्री पेक्षाही कठोर-पाषाण स्वरूपी आहे. आपल्यात श्रीरामास प्राप्त करून घेण्याविषयी तिच्या इतकी तळमळच नाही. आपण त्या शूर्पणखेपेक्षाही निम्नस्तराचे आहोत–हाच निष्कर्ष निघतो.

श्री साईसमर्थांचे स्वरूपही अदभुत आहे–हे खालील ओळीवरून स्पष्ट होतें.

रूप पाहतां तें गोमटें ।
परमानंदे कंठ दाटे ।
नयनी आनंदा पाझर फुटे ।
हृदयी प्रकटे अष्टभाव ।।७।।

सोहंभावास जागवीत।
निजानंदास प्रकटवीत ।
ठायींच मीतूंपणा विरवीत ।
सामरस्यें अद्वैत मिरवी ।।८।।

वाचू जातां पोथीपुराण ।
पावलो पावली सद्गुरुस्मरण ।
साईच नटे रामकृष्ण ।
करवी श्रवण निजचरित्र ।।९।।

–(अ-६–श्री साईचरित्र)

परिसूं बैसतां भागवत ।
कृष्णचि साई नखशिखांत ।
चाटे गाई ते उद्धवगीत ।
भक्तनिजहित साधाया ॥१०॥

दशरथ राजाच्या आज्ञेनुसार.

श्रीराम-लक्ष्मण महर्षि विश्वामित्राबरोबर सिद्धाश्रमात आलेत. विश्वामित्र मुनि आदि यज्ञ करीत आहेत. श्रीराम-लक्ष्मण यज्ञ कुंडांच्या सर्व प्रवेशदारांवर संरक्षणार्थ उभे आहेत. त्यांनी शक्तीदेवीची उपासना केली. फलस्वरूप सर्व दारांवर असंख्य राम-लक्ष्मण उभे असलेले दैत्यांना दिसत आहेत.

–साक्षात ईश्वरास पाहून दैत्य शिथिल पडतात.

–मनातील ईश्वराच्या नामस्मरणास पाहून 'षडरिपूंचे' ही आक्रमण स्थिरावते.

ईश्वरास पाहून दैत्य सैरावैरा पळतात.

नामस्मरणापुढे मनातील षडरिपू नष्ट होतात.

विश्वामित्र-मुनी यज्ञकुंडात आहुति टाकतात. परंतु संरक्षणासाठी उभ्या असलेल्या श्रीराम-लक्ष्मणाकडे पाहून त्यांचे मन दोलायमान होत आहे. त्यांचे सर्व लक्ष या श्रीरामचंद्र प्रभुकडेच आहे.

कर्मरत असूनही ईश्वराचे सतत चिंतन करा.

आपलेही सर्व कर्म यज्ञाच्या आहुतीप्रमाणेच होतील.

मनातील मलीनतेस नष्ट करण्यासाठीच यज्ञ केला जातो. यज्ञ, तप, स्वाध्याय व ध्यानाच्या परिणामस्वरूपच 'मन-शुद्धी' होत असते.

ईश्वरदर्शन वा साक्षात्कार हे मनशुद्धीचेच सुफळ आहे.

विश्वामित्रांनी यज्ञास प्रारंभ केला. हे दैत्यांनी ओळखले. करीता ते विघ्न टाकावयास प्रवृत्त झालेत. परंतु श्रीरामाच्या घडलेल्या वारंवार दर्शनाने मारीच या दैत्याचा स्वभाव पार बदलला.

ज्याच्या दर्शनाने स्वभाव बदलतो तोच ईश्वर.

आपल्या श्री साईमाऊलींच्या दर्शनाने केवळ मानवाचाच नव्हे तर पशुचा देखिल स्वभाव बदलतो–हे सर्व विदितच आहे. मारीचने ठरविले की, श्री विश्वामित्रांच्या यज्ञांत विघ्न टाकणे योग्य नाही.

"परंतु माझ्या मनांत असले विचार कसे काय उत्पन्न झालेत. आज माझे मनच माझ्या ताब्यात नाही. हे कसे काय? माझ्या मनावरील ताबा कसा काय सुटला? श्रीराम-लक्ष्मण आलींगन बद्ध होण्यास ते सारखे तळमळत आहे. अगाध प्रेमाने माझे हृदय ओथंबून आलेले आहे."

–असले विचारचक्र मारीच या दैत्याच्या डोक्यात फिरत आहे. मारीच सारख्या दैत्याची सुद्धा श्रीराम दर्शनाने बुद्धी सुधारली गेली.

अलीकडचे मानव सुद्धा श्रीराम–श्री साईच्या दर्शनास्तव जातात. एकदा नाही अनेकदा जातात. परंतु दर्शनोपरांतही बुद्धि-सुधार होत नाही.

ईश्वराच्या दर्शनानंतरही बुद्धिपालट न झाल्यास–

–'आपण दैत्यापेक्षाही अधम आहोत–'

हाच निष्कर्ष निघतो.

नित्यनियमित रामायण, श्री साईचरित्र, भागवत, महाभारत वाचले, देवदर्शन केले तरीपण जीवनांत संयम, सदाचार, सरलता आले नाहीत. तर आपण मारीच या दैत्यापेक्षाही निम्नस्तराचे आहोत–हे म्हणावे लागेल.

श्रीराम-श्रीसाई परमात्मा आहेत. ईश्वर दर्शनाने दैत्यरूपी बुद्धी बदलते तर त्यांत आश्चर्य कसले! श्रीरामाची नक्कल करता-करता व श्रीरामांचे चिंतन करता-करता रावणाचे काम मरत असतात.

मानवच काय तर पशु-पक्षी, कृमी-किटकसुद्धा ईश्वराच्या आज्ञेनुसारच वागतात. श्रीसाई-दर्शनाने वाघास सदगति मिळाली. श्रीसाईच्या आज्ञेमुळे सर्पाने तोंडात धरलेले बेडुक सोडले. अशी एकनाअनेक उदाहरणं आपणांस श्रीसाईचरित्रात सापडतात.

श्रीसाईरामास आठविल्यास संपूर्ण जगत मातृवत दिसते.

# सुगंधी भेट

★★★卐★★★卐★★★

—सौ. शैलजा अ. बुधकर,
४८४।९३, 'साफल्य',
मित्र मंडळ कॉलनी, पुणे–९.

० श्री साईबाबांची शिर्डी येथील पांढऱ्या शुभ्र पाषाण मूर्तीचे आकर्षण मला फार लहानपणापासून होते. आईवडील आम्हां भावंडांना घेऊन शिर्डीला वरचेवर जात. त्यावेळी मी आईजवळ बसून मूर्तीकडे तासनतास बघत बसे. पुढे मोठी झाल्यावर लग्न होऊन सासरी आले, आणि वडीलांची बदली शिर्डी हायस्कूलला मुख्याध्यापक म्हणून झाली. नंतर आईपण शिक्षिका म्हणून त्याच शाळेत काम करू लागली. माझ्या आनंदाला पारावार उरला नाही. आता माहेरी जाण्यासाठी जास्तच उतावीळ होऊ लागले. दरवर्षी या माहेरपण वास्तव्यात सकाळ-संध्याकाळ माझा वेळ कसा जाई ते समजत नसे. कारण देवळातील मूर्तीपुढे मी बसले की मला भान रहात नसे. दिवस जात होते. दोन मुलांची आई झाल्यावर मात्र शिर्डीला दरवर्षी जाणे जमेना. आईवडील निवृत्त होऊन पुण्यात स्थायिक झाले आणि शिर्डीच्या साईबाबांपासून आपण आता फार दूर चाललो आहोत अशी भावना होऊ लागली. माझ्या पायांच्या दुखण्याने तर ही भावना जास्तच बळकट झाली कारण तीनवेळा वाहन अपघात व मूळातच सुरू झालेली पायदुखी प्रवासात अडथळा आणी. सर्व बाजूने दुःख विसरण्याचा प्रयत्न करीत होते. राहिलेले शिक्षण सुरू केले. बरोबरीने होमिओपॅथी, कंपोझिंग, टायपिंग इ. कोर्स पुरे केले.

१९८० सालची मंगळवारची दुपार होती. कॉमर्सची १ ल्या वर्षाची परीक्षा जवळ आली होती. ऑक्टोबर मध्ये परीक्षा होत असल्याने हवा बरी असे. मुलगा १० वी इयत्तेत व मुलगी ५ व्या इयत्तेत शिकत असल्याने शाळेत गेली होती. स्वयंपाकपाणी जेवण इ. आवरून मी अर्थशास्त्र विषयाचा अभ्यास करावयाचा म्हणून पलंगावर पुस्तक घेऊन बसले. हा विषय अवघड जात असल्याने काळजीपूर्वक वाचीत होते. पलंगाच्या जवळच खिडकी आहे आणि शेजारी व्हॅक्यूम क्लिनर ठेवलेला होता. एक पान वाचून काढलं आणि ते आठवणीत रहावे म्हणून पुस्तक बंद करून समोर बघून आठवू लागले. त्याचक्षणी एक ओळखीचा सुगंध जोरदार आत घुसल्यासारखा जाणवला. मी

आठवते आहे की हा कशाचा बरं वास? त्याचक्षणी शेजारील व्हॅक्यूम क्लिनर वर श्री साईबाबांची शिर्डी येथील धवल रंगाची पाषाण मूर्ती दिसली. एकच क्षण, मला काही समजण्यापूर्वी मूर्ती नाहीशी झाली. मूर्ती हुबेहुब शिर्डीच्या देवळातल्या मूर्ती सारखी. तसाच गोरा रंग, भगवी कफनी, डोक्याला भगवं वस्त्र, एक पाय खाली सोडलेला व दुसरा पाय आडवा खाली सोडलेल्या पायावर, (मांडीवर) ठेवलेला हात आशिर्वाद देण्यासाठी वर केलेला असे रूप, जणू काही सांगत आहे की तुला शिर्डीची ओढ लागली आहे, मन शांत ठेव. हा संदेश मला पटला. माझं मन समाधानाने भरून आले. जीवाला शांतता लाभली.

त्यानंतर दोन वेळा शिर्डीला जाण्याचा योग आला. एक मात्र खरं संसारातील अडचणी, शारीरिक दुखणी, मुलांच्या समस्या सर्व वेळी मनाची शांती कधी बिघडली नाही की खचून गेले नाही. परंतु तरीसुद्धा मधूनच मनाला प्रश्न पडतो की हा काय प्रकार असावा!

卐

# साई कृपेने समाधी दर्शन

—श्री. शिवदयाल गो. अग्रवाल
मु. अर्जुनी (तिरोडा)
जि. भंडारा (महाराष्ट्र)

• 'शिर्डी के साईबाबा' या चित्रपटा अगोदर बाबांच्या जीवनाविषयी आम्हांस काहीच माहिती नव्हती!

वास्तविक पाहिले तर आम्हा पुरुषा व्यतिरिक्त घरच्या महिलांनी बोटावर मोजण्या इतके चित्रपट पाहिले असतील.

तो योगायोग म्हणा, मी व आई तब्येत तपासणी करिता गोंदियास गेलो असताना 'शिर्डी के साईबाबा' चित्रपट पहाण्याचा योग आला. चित्र-पटातील बाबांचे चरित्र पाहून मन प्रसन्न झाले व मनांत ठरविले की, मी तर नेहमी प्रवास करीत असतो पण आईबरोबर एकदा तरी साई समाधीचे दर्शन घ्यावे.

यंदा मला नंदुरबारला तेरवी व लग्नानिमित्त जावयाचे असतांना मी आईला चलण्याविषयी आग्रह केला पण तिने टाळले. पण जेव्हा मी म्हटले की, तुला शिर्डीला सुद्धा साई दर्शनाला घेऊन जाईन तेव्हा ती प्रकृती बरी नसतानाही तयार झाली.

अशाप्रकारे २–३ वर्षां अगोदर केलेला संकल्प यंदा बाबांच्या कृपेने पार पडला. मी व आई कधीही सोबत बाहेर प्रवासाच्या निमित्ताने पडलो नाही. कारण एखादी जबाबदार व्यक्ती म्हणून घरी राहावी लागत असे !

जो जो मज भजे जैसा जैसा भावे।
तैसा तैसा पावे मीही त्यासी ॥

हेच खरे.

---

# गणूचा उद्धार–कथानक

० (गणू सहस्त्रबुद्धेना शृंगारिक लावण्या करण्याची व तमाशे पहाण्याची फार आवड. पोलीस बनून हुशारीने फौजदार व्हावे ही त्यांची महत्त्वाकांक्षा. एकदा चांदोरकर साहेबांबरोबर त्यांना शिरडीला जाण्याचा योग आला. बाबांनी त्यांना सद्गुरूंच्या पायात तिर्थ असतात असे सांगितले व गंगा यमुनांचे दर्शन घडविले. लावणी करण्यापेक्षा देवासाठी काही लिहिले तर तुझे कल्याण होईल असे सांगितले. पायातून गंगा यमुना पाहून गणू थक्क झाला व तो बाबांचा शिष्य झाला त्यांचे जीवन बदलून गेले व ते संत दासगणू नावाने प्रसिद्ध झाले. पुढे त्यांनी साई जीवनावर खूप काव्य केले.)

**ब्राम्हण कुळी जन्म घेऊनी रस तमाशात**
**दंग असे तो रात्रंदिनी लावणी रचण्यात**
**स्नान संध्या देवपूजा जप चाले दिवसास**
**परंतु रात्री तो प्रिय असे तमासगिरास ॥१॥**

**ब्राम्हण असूनी पट्टेवाला सिवा समाजात**
**परि पट्टीचा लावणीकार मान तमाशात**
**पोलीस बनूनी हुशारीने व्हावे फौजदार**
**प्रयत्न त्यांचे असे निरंतर त्यासाठी फार ॥२॥**

नशिब त्याचे उदया आले एक दिन पाही
गणू आला द्वारकामाईत भेटण्या श्रीसाई
नमन करूनी उभा राहिला एका बाजूस
सोबत होते त्याचे साहेब दुसऱ्या बाजूस ॥३॥

बाबा वदति "गणू कारे तीर्थ यात्रा करिसी?"
सद्‌गुरुच्या पायी वसे तिर्थ प्रयाग काशी
गणू बोले "जरी दावाल तिर्थ तुमच्या पायी"
आजन्म सेवा करिन तुमची श्री बाबा साई ॥४॥

बाबा वदति "गणू आता बघ ह्या पायांकडे"
वदताची गंगा यमुना द्वय अंगुष्टी पडे
गंगा यमुना पाहुनी तेथे गणू थक्क झाला
वेगे जाऊनी गुरु म्हणूनी पायी नम्र झाला ॥५॥

बाबा वदति "गणू काय तारिल ही लावणी?"
कृपा असता शारदेची काय ही निंद्य गाणी
अरे लाव तुझी सेवा, काव्य, सत्कार्या कारणे
कर कितंन, प्रवचन गा, ईश्वरा कारणे ॥६॥

अहोरात्र कितंन, प्रवचन, देवांची सेवा
करित आयुष्य वेचले श्री दासगणू देवा
जशी उद्धरली सती अहिल्या रामाच्या पायी
तसाच उद्धार झाला गणूचा बाबांच्या पायी ॥७॥

—श्री. कृ. भा. देशमुख.
३८३, शुक्रवार पेठ, पुणे २.

# पितृतुल्य भ्राता माझा वनवासी झाला

(चाल : उघड दार देवा आता उघड दार देवा)

चला राम राया, अयोध्ये पुरीला–
पितृ तुल्य भ्राता माझा वनवासी झाला ।। धृ ।।

रामवीण झाली माझी निष्प्राण काया
रथारुढ होऊनि आता चला राम राया ।।
अयोध्येस घेऊनि जाण्या भरत आज आला ।
पितृ तुल्य भ्राता माझा वनवासी झाला ।। १ ।।

नसे आज पितृ छाया नाही प्रीय माता ।
राम हृदयी ना ये कैसी, दया माझी आता ।।
बसा राज गादीवरी त्या राज नगरीला ।
पितृ तुल्य भ्राता माझा वनवासी झाला ।। २ ।।

दयेचा तू सागर जगती, दया कर आता ।
दया मागतो ही रामा, तुझा लहान भ्राता
नको राज गादी मजला, राज्यही कशाला ।
पितृ तुल्य भ्राता माझा, वनवासी झाला ।। ३ ।।

मागणे हे एकच रामा भरताचे ऐका ।
पुजनिय द्या ह्या आता आपुल्या पादूका ।।
नका लोटू भरतासी ह्या, चरणी आज आला ।
पितृ तुल्य भ्राता माझा वनवासी झाला ।। ४ ।।

।। श्री राम ।।

–श्री. मधुकर अंबाडे,
अंबाडे हाऊस, दांडिया बाजार
बडोदा.

# श्रीसाई दर्शन

नयनी उभी राहते श्री साईबाबांची मूर्ती
त्रिभुवनात दुमदुमते श्री साईबाबांची किर्ती ॥ धृ॥

नयन मनोहर हास्य विलसे वदनी
आशिर्वादाचा कर फिरे ममतेनी
श्रद्धा सबुरी मंत्र दिला बाबांनी
साईच्या दर्शनाला भक्त येती दूरूनी ॥ १ ॥

भक्तांसाठी हाक मारिता कृष्णासम येती धावूनी
भक्त बोलती साईनाथ साईनाथ मुखानी
उदी भाळी लाविता प्रसन्न चित्त होई
संजीवनीचा लाभ घेता धन्य धन्य होई ॥ २ ॥

प्रभात समयी दर्शन घेता शांत मन होई
मुखाने तुमचे नाम घेता हर्ष भरूनि राही
श्री साईबाबा लिहिण्यासाठी तुम्ही दिली शक्ती
श्री साईदर्शन लिहिता उचंबळूनि आली भक्ती ॥ ३ ॥

थोर जन म्हणती दसऱ्याला पुण्यतिथीची पासष्टी
चराचरातूनी व्यापूनी तुम्ही आहात ही सृष्टी
पुण्यतिथीच्या दिनी वाहते ही काव्य सुमनांजली
शरीराने जरी अपंग असले तरी मनी वसे
अभंग श्रद्धा हृदयातली ॥ ४ ॥

—कु. सरल प. खारकर
साई निवास ' प्लॉट नंबर ३६ ए (पूर्व)
ब्लॉक नंबर ४ पहिला माळा,
सायन हौसिंग सोसायटी शीव, मुंबई २२.

# " साईनाथ हॉस्पिटल, "

—कु. रेखा दिघे

भक्तांच्या कैवारासाठी देह धारण करून परमेश्वर अवतरतो, मग अज्ञानरुपी अंधःकार पार नाहीसा करून टाकतो. अधर्माची हद्द तोडून, दोषांच्या सनदा फाडून सज्जनांच्या हातून सुखाची ध्वजा उभारवितो. श्री साईबाबा हे देखील अशाच अवतारी सज्जनांपैकी एक, ते कोण, कुठले हा अजूनही वादग्रस्त प्रश्न मनाला सतत भेडसावित असतो. परंतु ती एक थोर विभू ी होती ही गोष्ट मात्र निर्विवाद. साईबाबा जेव्हा शिर्डीत आले तेव्हा त्यांना अनेक प्रकारच्या त्रासातून जावे लागले. लोकांनी त्यांना छळले. परंतु दैं ी शक्तीपुढे कोणाचे चालते? ज्यांनी त्रास दिला, त्यांना या ना त्या तऱ्हेने या सर्व गोष्टींना तोंड द्यावेच लागले. परंतु यालाही बाबांनी दुजोरा असाच दिला की, अरे त्याने तुझे वाईट केले तर त्याचा मोबदला म्हणून तू त्याचे कधीही वाईट करु नकोस. वाईट चिंत नकोस. वादविवाद करत बसले म्हणजे देव भेटत नाही. त्यासाठी स्वतःजवळचा अभिमान विसरायला लागतो. जो काम, क्रोध, मत्सर यावर मात करतो तो ईश्वराच्या समीप जातो. ईश्वरप्राप्तीच्या उंबऱ्यात मोडणारे भक्ती व योग हे दोन मार्ग आहेत. ईश्वराच्या ठिकाणी मित्र, शत्रू हा भेद कधीच नसतो. घरच्या माणसांना उजेड पाडावा व परक्यांना अंधार पाडावा हे जसे दिव्याला ठाऊक नसते. जो तोडण्याकरिता घाव घालतो किंवा जो लागवड करतो, त्या दोघांना वृक्ष जसा सारखी सावली देतो, ज्याप्रमाणे ऊस हा आपल्या पिकास पाणी घालून वाढविणाराला गोड, व चरकात घालून गाळणाऱ्याला कडू असा असत नाही, ज्याच्या मनाची स्थिती मान व अपमानाच्या वेळी सारखीच राहते. तिन्ही ऋतुमध्ये आकाश जसे सारखे राहते, दक्षिण दिशेकडील व उत्तर दिशेकडील वाऱ्यांमध्ये जसा मेरु पर्वत अचल असतो, चांदणे जशी आपली मधुरता राजा व रंक यांना सारखीच अनुभविण्यास देते, तसा परमेश्वर हा स ं प्राणिमात्रांच्या ठिकाणी सारखाच असतो. तो निंदेने खिन्न होत नाही व स्तुतीने चढून जात नाही. ज्याप्रमाणे आकाशाला रंगाचा लेप लागणे शक्य नाही त्याप्रमाणे निंदा व स्तुती यांचा त्यांच्यावर काहीही परिणाम होत नाही.

जो काम, क्रोध, मत्सर सर्वांवर मात करतो तोच परमेश्वरापर्यंत पोहोचतो. हरी हरी करून देव भेटत नाही. तर त्याकरीता रंजल्या गांजल्या दीन-दुबळ्या व दुःख पीडीतांची सेवा करणे हीच खरी ईश्वरसेवा आहे. त्यांतूनच परमात्म्याचे खरे दर्शन घडते. जो या सर्वांना आपले मानून त्यांची सेवा आनंदी वृत्तीने करतो तोच परमात्म्याच्या समीप जातो.

**फाटके तुटके नेसतो रे। मन मानेल तेथे बसतो रे।।**
**वेड्या वेड्यापरी दिसतो रे। परी ब्रम्हमांड गिळून असतो रे।।**

अशी स्थिती असलेल्या या अवलियाने अनेक दीनदुःखीतांची, दीन दुबळ्यांची सेवा करण्यांत आपला बराचसा काळ घालवला. वेळप्रसंगी ते स्वतः लोकांना औषधपाणी देत असत, त्यांची सेवाशुश्रुषा करीत असत. ध्येय एकच, त्यांच्यातच खरीखुरी परमेश्वराची सेवा आहे.

हे साईबाबांचे व्रत, हा साईबाबांचा वारसा, आजही या शिर्डी गावात चालत आला आहे. या व्रताची आठवण म्हणून श्री क्षेत्र शिर्डी येथे मोफत औषधोपचार होण्याच्या दृष्टीने सन १९५० चे सुमारास होमिओपॅथी दवाखाना सुरु करण्यात आला. सध्या जी इमारत 'साईनाथछाया' या नावाने ओळखली जाते. त्याच इमारतीत त्यावेळी, डॉ. रुस्तुमजी, डॉ. कीर्तिकर, डॉ. गुजराथी यांनी रुग्णांची सेवा करण्याचा लाभ मिळविला. होमिओपथि बरोबर, अॅलोपथिक व आयुर्वेदिक औषधांचाही वापर केला जात असे.

सन १९६० साली संस्थानचा कारभार कोर्ट रिसीव्हरचे ताब्यांत ल्यानंतर व्यहारात साहजिकच सूसुत्रता आली. जुना दवाखाना वाढत्या लोकसंख्येच्या मानाने अपुरा वाटू लागला. श्री साईबाबांनी घालून दिलेली रुग्णसेवा ही परंपरा अधिकाधिक विस्तृत करावी, या उद्देशाने सन १९६०-६१ साली हॉस्पिटल बां वे असा विचार त्यावेळचे संस्थानचे पहिले रिसीव्हर श्री. क्षीरसागर व डॉ. गुजराथी यांनी निश्चित केला. रुग्णसेवा हे श्रीसाईबाबांचे हयाती पासून चालत आलेले प्रमुख ध्येय असल्यामुळे, हॉस्पिटल विस्ताराच्या कार्यास प्रतिसादही तसाच मिळाला. श्री. हरिभाऊ शेळके यांचेकडील अंदाजे २८ गुंठे जागा 'बक्षिस' रुपाने मिळविण्यात संस्थान यशस्वी ठरले. दिनांक ७।८।६२ रोजी मा. यशवंतरावजी चव्हाण (मुख्यमंत्री) यांचे हस्ते हॉस्पिटल बिल्डिंगचे भूमिपूजन होऊन बांधकामास सुरुवात झाली. त्यावेळचे रिसीव्हर श्री. क्षीरसागर यांचे काळात भूमिपूजन झालेला हॉस्पिटलचा उदघाटन समारंभ श्री. शेषराव वानखेडे यांचे हस्ते, त्यावेळचे रिसीव्हर श्री. एस्. बी. दर्प यांचे कारकीर्दीत, दि. १४ मे १९६४ रोजी पार पडला. २४ खाटांची सोय असलेले, हे हॉस्पिटल श्री साईनाथ हॉस्पिटल या नावाने ओळखले जाऊ लागले. त्यावेळी डॉ. सुभाष गुजराथी हे आर्. एम्. ओ. म्हणून काम पहात होते. तसेच नगरचे डॉ. केतकर ऑनररी काम करीत होते. सुरुवातीस ऑपरेशन थिएटर, २४ खाटांची इनडोअर पेशंट, ओ. पी. डी., प्रयोगशाळा, एवढी सोय होती.

१९६५ सालापासून डॉ. जे. एल्. जी. पिंटो आर्. एम्. ओ. म्हणून काम पाहू लागले. रुग्णालयाची कार्यालयीन व्यवस्था, औषध खरेदी व

विनिमय, केसपेपरत्रे रेकॉर्ड इ. बाबतीत डॉ. पिंटो यांनी बरीच सुसुत्रता आणली. आजही थोड्याफार फरकाने तीच चालू आहे.

१९६४ ते १९७४ या कालावधीत डॉ. पिंटो व डॉ. देशपांडे यांनी अनुक्रमे आर्. एम्. ओ. व एम. ओ. म्हणून काम पाहिले. जसजसे दिवस जाऊ लागले तसतशी रुग्णालयाची वाढही होऊ लागली. वेगवेगळ्या भक्तांची तसेच गावातील व आसपासच्या लोकांची सेवा करण्याचा अधिकाधिक लाभ मिळण्याच्या दृष्टीने, शस्त्रक्रिया, नेत्रविभाग, दंतविभाग, बालरोग तज्ञ, कान नाक घसा या वैद्यकीय शाखेतील तज्ञांची सेवा उपलब्ध करुन देण्यात आली. सध्याची २४ खाटांची संख्या अपुरी पडू लागल्यामुळे 'बालकक्ष विभाग' (childrens ward) हा १० खाटांचा नविन विभाग दुसऱ्या मजल्यावर सुरु करण्यात आला.

१९७४ साली डॉ. पिंटो यांनी राजिनामा दिल्यानंतर डॉ. हनसे, डॉ. सास्तुरकर, डॉ. केळकर, डॉ. जोशी यांनी आर. एम्. ओ. म्हणून काम पाहिले. श्री साईबाबांचे दरबारी उच्चनीच हा भेदभाव किंवा जातीयभाव कधीच नसल्यामुळे साईनाथ हॉस्पिटलची रचना देखील हेच ध्येय समोर ठेवून करण्यात आली होती. परंतु कालानुरुप सर्वच गोष्टी बदलणे प्राप्त होते. तसेच या रुग्णालयात देखील स्पेशल रुम्सची उणीव भासू लागली. त्याप्रमाणे १० स्पेशलरुम्स बांधून प्रत्येक रुममध्ये २ अशाप्रकारे २० खाटांची सुविधा वाढविण्यात आली. व एकूण ५४ खाटांची सोय करण्यात आली.

लोकसंख्येबरोबर, रुग्णालयाचा व्यापही साहजिकच वाढू लागला. हा वाढता व्याप लक्षात घेऊन मानद डॉक्टरांची संख्या व सेवा वाढविण्यात आली. व आता १) डॉ. काळे–सर्जन २) डॉ. पटेल–पिडीयाट्रीशियन ३) डॉ. याडकीकर आर्थोपीडीक ४) डॉ. पारगांवकर–फिजिशियन ५) डॉ. आपटे–नेत्रतज्ञ ६) डॉ. गाडगीळ–डेन्टीस्ट ७) डॉ. देशपांडे–गायनॉकालॉजिस्ट ८) डॉ. गोंधळे–नाक–कान–घसा तज्ञ अशा आठ शाखेतील सेवा उपलब्ध करुन देण्यातही साईनाथ हॉस्पिटल यशस्वी ठरले आहे.

दिवसेंदिवस शिरडीस येणाऱ्या लोकांच्या संख्येतही वाढ होऊ लागली आहे. इतर लोकसंख्येतही होणारी वाढ लक्षात घेतली तर, सध्याचे ५४ कॉटची संख्या अपुरी पडू लागल्यामुळे १९८३ साली विस्ताराची योजना हाती घेण्यात आली. आता १०० खाटांचे रुग्णालय पूर्ण करण्यात आले. या जुन्या बिल्डींग-वरचा एक मजला वाढवून त्यात अनेक अत्याधुनिक उपकरणांची सोय करून, शिर्डी सारख्या एका गावात अत्यंत उत्कृष्ट सर्व आधुनिक साधन सामुग्रीनी परिपूर्ण असे रुग्णालय म्हणून नावलौकीक मिळविण्यात श्रीसाईनाथ हॉस्पिटल

हे अग्रगण्य ठरले आहे. रुग्णालयाची रचना आधुनिक पद्धतीने केलेली असून, बऱ्याच प्रमाणावर शहरी धर्तीची आहे. बाळंतीणींचा विभाग स्वतंत्र असून पुरुष–स्त्री–बाल असे विभाग करण्यात आले होते. परंतु वाढत्या संख्येचा विचार करून, तसेच जागेचा फायदा घेऊन आता सर्जिकल, मेडिकल, गायनॅक असे तीन स्वतंत्र विभाग पाडण्यात आले आहेत. सर्व विभाग विस्ताराप्रमाणे अत्या-धुनिक साधनसामुग्रीनी परिपूर्ण आहेत. सिस्टोस्कोप, रिसेक्टोस्कोप यासारखी अद्यावत उपकरणांची भर पडल्यापासून, दुर्बिणीने शस्त्रक्रिया करणे व दुर्बिणीच्या साहाय्याने प्रोस्टेड करणे व आतून तपासणी करणे इत्यादी सहज शक्य झाले आहे.

रुग्णालयात सध्या एक परिपूर्ण असे ऑपरेशन थिएटर असून त्याच्या जोडीस अल्पशस्त्रक्रिया थिएटर पण आहे. त्याचबरोबर फिजिओथेरपीची व्यवस्था आहे. श्री साईनाथ हॉस्पिटल शिरडी येथे परिपूर्ण अशी प्रयोगशाळा रक्तदानाच्या सोयीसह उपलब्ध आहे. ५०० एम. ए.चे अद्यावत एक्सरे मशीनही नवीनच बसविण्यात आलेले असून सर्व प्रकारच्या 'क्ष' किरण तपासणीची माफक दरात सोय झालेली आहे. तसेच इ. सी. जी. बेबी इन्क्युबेटर फिजिओथेरपीची अनेक उपकरणे उपलब्ध आहेत. सध्या रुग्णा-लयाच्या इनडोअर पेशंटची मर्यादा ६० असून नवीन वाढीनंतर ती १०० पर्यंत होईल. दैनंदिन बाह्य रुग्ण विभागात २०० ते २५० ओ.पीडी.आहे.

श्री साईबाबांचे रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा हा वारसा आजही साईनाथ हॉस्पिटल येथे चालू आहे. बाबांची शिकवण आजही येथील कर्मचाऱ्यांच्या ठिकाणी तसेच येथील अधिकारी वर्गाच्या अंगी व्यापलेली आढ-ळून येते. रुग्णालयात फक्त २५ पैशाच्या केसपेपरवर १ दिवसाचा औष-धोपचार करण्यात येतो. प्रयोगशाळेत 'क्ष' किरण, इ. सी. जी. साठी सुद्धा नाममात्र फी आकारण्यात येते. साईबाबा संस्थान दरवर्षी ५ ते ६ लाख खर्च करते व उत्पन्न मात्र सव्वा ते दीड लाख असते. बहुतांशी रुग्णांना मोफतच इलाज होतो यावरून कल्पना येईलच. फक्त येणाऱ्या रुग्णांना औषधाचीच व छोटी मोठी ऑपरेशन्स एवढेच साईनाथ रुग्णाल-याचे कार्य नसून, दरवर्षी वेगवेगळ्या प्रकारची शिबिरे भरविण्यात येत असतात. यातही श्रीसाईनाथ रुग्णालयाने उच्चांक गाठलेला आहे. कृत्रिम दात देणे, संतती नियमनाची ऑपरेशन, मुस्लीम Vasectomy Camp, पोलीओ शिबीरे इ. वेगवेगळ्या प्रकारची शिबिरे भरविली जातात, सन १९७९ पासून ८४ पर्यंतच्या काळात ७ नेत्रशिबिरे, दोन अस्थिव्यंग. पोलीओ शिबीरे, चार संततीनियमन (स्त्री रुग्ण) शिबिरे एक सुदृढ बालक स्पर्धा इ. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यात आले आहेत. व वेळोवेळी लोकां कडूनही चांगला प्रतिसाद मिळालेला आहे. त्यायोगे रुग्णसेवा व राष्ट्रसेवा समाजाच्या अंतिम स्तरापर्यंत पोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. १९८३ साली समाज सेवेसाठी मिळणारे महाराष्ट्र सरकारचे पारितोषिक

श्री साईनाथ रुग्णालयाने पटकाविले असून, १९८४ साली एका दिवसात ७२२ पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया करुन एक उच्चांक प्रस्थापित करण्यात आला आहे

रुग्णालयाच्या विस्ताराचे काम पूर्ण होत आले असून, नवीन इमारतीत सुसज्ज असे ऑपरेशन थिएटर आहे. रुग्णालयात फक्त शिर्डी गावांतील लोक नसून बहूकडील रुग्ण लोक येत असतात. अशावेळी त्यांच्या नातेवाईकांची राहण्याची, जेवणाखाण्याची गैरसोय लक्षांत घेऊनच रुग्णालयाच्या आवारात त्यांच्यासाठी धर्मशाळा, कॅन्टीन इ. सोयी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. वाढत्या व्यापाबरोबर कर्मचाऱ्यांच्या संख्येतही वाढ करणे स्वाभाविकच आहे. कर्मचा ऱ्यांच्या निवासाची सोय करण्याचा विचार अधिकारी वर्गाला पडलेला नसून, त्यांच्यासाठीही निवासाची सोय करण्यात आलेली आहे. सर्व उपकरणे २४ तास उपलब्ध करुन देण्यासाठी जनरेटरची स्वतंत्र सोय करण्यात आलेली आहे. तसेच मृतदेह ठेवण्यासाठी Dead body room ही बांधण्यात आली आहे.

श्री साईनाथ हॉस्पिटलच्या विस्ताराचे काम पूर्ण होत आले असून त्याचा उद्‌घाटन समारंभ, मुंबई सिटीसिव्हील व सेशन्स कोर्टाचे जज्ज मा. मखिजानी साहेब, यांचे शुभहस्ते सोमवार दिनांक २-४-८४ (गुढीपाडवा) रोजी आयोजित केलेला असून अध्यक्षस्थान भूषविण्यासाठी मा. लखिना साहेब, कलेक्टर साहेब, अहमदनगर लाभलेले आहेत.

## साईभक्त डॉ. दाजीसाहेब बाबरे यांचे देहावसान

दादर-पोर्तुगीज चर्च जवळ रहाणारे मुंबईतील एक विख्यात डॉक्टर व ज्येष्ठ साईभक्त डॉ. मधुसूदन एस. बाबरे यांचे सोमवार ता. ५-३-८४ रोजी हृदय विकाराने अचानक देहावसान झाले. उमरखाडी येथे त्यांनी आपल्या वैद्यकीय व्यवसायास सुरुवात करून प्रामुख्याने गोर गरीबांची त्यांनी सेवा केली. दादर शिवाजी पार्क येथे १९४९ साली त्यांनी भारत क्रिकेट क्लबची स्थापना केली होती. ते त्या संस्थेचे १५ वर्षे अध्यक्ष होते. चिंचणी या आपल्या गावी त्यांनी सार्वजनिक सभागृहाची स्थापना केली होती. तिथे त्यांनी श्री साईबाबांचे एक मंदिरही बांधले होते. शिरडीची वारी ते दरहमेशा करीत असत. त्यांच्या डोळयात मोतीबिंदू होता. त्यामुळे त्यांना दिसत नसे पण त्यांनी ऑपरेशन केले नाही. तर श्री बाबांची उदी पाण्यात मीसळून ते पाणी रोज सकाळी उठल्याबरोबर चार थेंब डोळयात सोडीत व आपल्या दैनंदिन व्यवसायास लागत. त्यामुळे त्यांना व्यवस्थित दिसत असे त्यांनी अनेकदा झालेल्या आमच्या गाठी भेटीत सांगितले होते. शिरडीतील श्री बाबांची चावडी ही त्यांच्याच वाडवडीलांकडून बाबांनी बांधवून घेतलेली होती.

निधन समयी त्यांचे वय ६९ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक डॉ. पुत्र, दोन सुशिक्षित विवाहित कन्या, बंधू व असंख्य मित्रपरिवार आहे.

श्री साईबाबा मृतात्म्यास चिरशांती व सद्‌गती देवोत.

# शिरडी–वृत्त माहे जानेवारी १९८४

या महिन्यात श्रींच्या दर्शनासाठी साईभक्तांची गर्दी बरीच होती. काही कला–कारानी श्रीच्यापुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे:–

**कीर्तन** (१) एकादशी व महत्वाचे दिवशी संस्थानतर्फे कीर्तने झाली.
(२) ह. भ. प. रामराव गोविंदराव डुकरे. पेठ.
(३) ह. भ. प. विश्रामबाबा ठुबे., निमगाव.

**प्रवचन** – (१) ह. भ. प. श्रीराम दिनकर परचुरे, मुंबई.
(२) ह. भ. प. शंकर विश्वनाथ उर्फ तात्यासाहब, देवधर महाराज, पंढरपूर.

**भजन, गायन, वादन वगैरे** –(१) श्री. भोलानाथ. रामनाथ समेळ, गिरगाव (२) श्री. नंदकुमार सदानंद सारंगधर, मुंबई, (३) श्री. भक्तसंगम मंडळ, मुलुंड, (४) श्री. अनुप-शलोटा, मुंबई, (५) सौ. शलोटा, मुंबई आणि साथीदार, (६) विमल भाऊसाहेब शिर्के, जळगांव, (७) श्री सत्यसाई भजनी मंडळ, वालेटव, (आंध्र), (८) रंजना कलामंडळ, विजया गदरे, कुर्ला, (९) रेनू कौशीक, सिमला, (१०) श्री. साईनाथ गीतधारा, ताडदेव, (११) श्री. साई टिटोरीयल कॉलेज, शिकंदराबाद, (१२) सौ. तितीक्षा बलसारी, मुंबई, (१३) सुपरस्टार ऑर्केस्ट्रा–श्री. एकनाथ मिराशी व पुढील कलाकार, (१४) श्री. मनोहर वाळवे, (१५) श्री. समर्थ आयरे, (१६) श्री. सुधीर शिखडकर, (१७) श्री. अविनाश पेंडणेकर, (१८) (१९) श्री. भालचंद्र तांदळेकर. (२०) श्री. अरुण शिर्के, (२१) श्री चंद्रकांत तीळवे, (२२) श्री. सुर्यकांत तीळवे, (२३) श्री. दिपक तांबे, (२४) श्री. चंद्रकांत मिस्त्री, (२५) कु. विजया होजवडेकर, (२६) कु. नंदा गोवेकर, (२७) श्री. तानाजी हाडसे, (२८) श्री. विनायक गोवेकर, (२९) श्री. दिपक घोष, (३०) श्री. हरीचंद्र नेवरेकर, (३१) श्री. श्रीधर नेवरेकर, (३२) श्री. सिदधार्थ पांचाळ, (३३) श्री. सचीन आयरे, (३४) श्री. विजय मिराशी, (३५) श्री. रमेश पालव, (३६) श्री. विनय सावंत, (३७) श्री. सुरेंद्र परब, (३८) श्री. विश्वनाथ घाडीगांवकर, (३९) श्री. चंद्रकांत सातकर, (४०) श्री. शरद पांचाळ, (४१) श्री. जुगलकिशोर ब्यास, (४२) कु. रेणूका मिस्त्री, (४३) कु. विजया वाळवे, (४४) श्री. नारायण काशीनाथ कुशे, (४५) श्री. आत्माराम रावण, (४६) श्री. राजन पवार; (४७) श्री. अनिल जाधव, (४८) श्री. गजानन भजनी मंडळ, कुकशेत, (४९) श्री. दत्ता विठ्ठल घाग, श्रीवर्धन, (५०) श्री. सोहनलाल शर्मा, दिल्ली, (५१) श्री. पांचाळ अनंत दत्ताराम, गोरेगांव, (५२) श्री. घौसपकर दिपक, ठाणे, (५३) श्री. इंद्रकुमार रैकवार, जबलपूर, (५४) समता साईकृपा मंडळ, द्वारा कु. गोदावरी तारळकर, भायखळा,

(५५)श्री. आप्पा सामंत, दादर, (५६) श्री. राजाराम सामंत, वरळी, (५८)श्री. शिवराम भिकाजी भांगरे, शिवडी, (५९)श्री. अहमदखान गुलाबखाँ, लक्ष्मीवाडी, (६०) श्री. सुमंत तुकाराम शिंदे, (६१) श्री साईनाथ भजनी मंडळ, परळ, (६२) श्री. बाळ चावरे, दादर. (६३) श्री. लक्ष्मीमाता भजनी मंडळ, मुंबई, (६४) श्री. पी. ए. भागवत, बडोदा, (६५) श्री. हसमुख ओंकार पाटील, नवापूर, (६६)श्री. विजय जाधव, गिरगांव. (६७)श्री. साईलीला लेखक—कवी संमेलन १० वे चे कलाकार—'लावणी सम्राज्ञी आसावरी वायकूळ, घाटकोपर, (६८)श्री. वसंत प्रधान मुलूंड, (६९) श्री. नागेश मोगलाईकर, धुळे, (७०) श्री. ग. रा. पालकर, मुंबई, (७१)श्री. जगन्नाथ कुलकर्णी, पुणे, (७२) श्री. बापूसाहेब निरखे, इंदोर, (७३) श्री रमेश चव्हाण, नवापूर, (७४)श्री. गुंडेराव पटवारी, विदर, (७५)सौ. सरोजिनीताई मुळे, इंदोर, (७६)श्री. प्रकाश करपे, इंदोर, (७७)डॉ. हिबारे, विदर, (७८)सौ. शांता सरोदे, (७९)डॉ. इंदू नाईक, लोणावळा, (८०)डॉ. सुमन खानविलकर लोणावळा, (८१)कु. राहुल खानविलकर, लोणावळा, (८२)सौ. शशी रेवणकर, अंबरनाथ, (८३)श्री. शिवाजीराव मोरे, दोंडाईचा, (८४)श्री. दत्तुमोरे शाहीर, पुणे, (८५)श्री. संजय परळकर, मुंबई, (८६)सौ. नंदिनी पाटील, कोल्हापूर, (८७) कु. जागृती पाटील, नवापूर, (८८) श्री. डी. बी. पोतनीस, पुणे., (८९)श्री. जे. के. पुरी, चंदिगड, (९०)श्री. मधुकर मंडलीक, नवापूर, (९१) श्री. आय. ी. मेहता, चंदीगड, (९२)श्री. विजय हजारे, बोरीवली, (९३)सौ. सिंधू सणस, (९४)श्री. शांतीलाल सी. दवे, नवापूर, (९५)श्री. जयवंत कुलकर्णी, मुंबई, (९६)डॉ. सौ. मालती रहाटे, रहाता, (९७)श्री. अनंत पांचाळ, मुंबई, (९८)श्री. विनोद शेटे, मुंबई, (९९)श्री. दिलीप सावंत, (१००)श्री. जगदिश देवपूरकर, धुळे, (१०१)सौ. लीलाताई मराठे, धुळे, (१०२)श्री. हसमुख पाटील, नवापूर, (१०३)श्री. जामसिंग रजपूत, हेंदरूण. (१०४) सौ. स्वादिया, मालाड, (१०५) सौ. जेऊरकर, डोंबीवली, (१०६) श्री. करंबेळकर, चेंबूर, (१०७) श्री. सांडभोर, पुणे, (१०८) श्री. सुभाष वैष्णव रनाळे, (१०९) श्री. उरणकर- पनवेल- (११०) कु. शैला मराठे धुळे, (१११) श्री. सुधीर जोशी, पुणे, (११२) सौ. जगतकर शकुंतला, मुंबई, (११३) श्री. सुर्यकांत दळवी, मुंबई, (११४) कु. वैभव दांडेकर, (११५) श्री. चेतन गुप्ता, डोंबीवली (११६) श्री. अनिल लुतडे, वर्धा, (११७) कु. स्वप्नील पाटील, [कोल्हापूर, (११८) सौ. कुमुदिनी टिळक, डोंबीवली, (११९) कु. दिपक रेवणकर, अंबरनाथ, (१२०) श्री. बाळासाहेब नाडकर्णी, कोल्हापूर, (१२१) कु. अनुराधा, झोपे, धुळे, (१२२) श्री. कोळंबकर, बोरीवली, (१२३) सौ. सांडभोर कमलताई, पुणे, (१२४) सौ. वसुंधरा चोरे

मुंबई, (१२५) श्री. नाचणे चंद्रकांत, मुंबई, (१२६) सौ. मुळे उषा प्रभाकर, पुणे, (१२७) सौ. अस्मीता दांडेकर, मुंबई, (१२८) सौ. क्षमा खानविलकर, लोणावळा, (१२९) कु. अपर्णा खानविलकर, (१३०) डॉ. जी. आर. विजयकुमार, (१३१) सौ. सुनीता बदले, बैतुल, (१३२) श्री. एच. ी. महाले, बैतुल, (१३३) श्री. ए. पी. त्रिपाठी, बैतुल, (१३४) श्रीमती लीलाताई गुजराथी, शिरडी, (१३५) कु. शैला देवपूरकर, (१३६) श्री. मधुकर गजाननराव आंबाडे, (१३७) श्री. दिनेश राजाराम पाटील, (१३८) श्री. रणजीत पाटील, कोल्हापूर, (१३९) सौ. सगुना चंदावरकर, बागलकोट, (१४०) श्री. प्रभाकर गोविंद कळमकर, (१४१) श्री. संजयानंद स्वामी, (१४२) सौ. मीरा संजयानंद स्वामी, (१४३) कु.नीलम सांगलीकर, (१४४) कु. गौरव बी. स्वादिया, (१४५) कु. विनीता बी. स्वादिया, (१४६) कु. धरा. बी. स्वादिया, (१४७) श्री. श्रीराम सातर्डेकर, मुंबई, (१४८) डॉ. एम. के. कीर्तीकर, (१४९) श्री. बीपीन स्वादिया, मालाड, (१५०) सौ. मयुराबाई बिदर, (१५१) शाहा, (१५२) निनाद वायकुळ, मुंबई, (१५३) सौ. ज्योती मनुजा, खार, (१५४) कमलबाई गजाननराव अंबाडे, (१५५) श्री. हनुमानप्रासादिक भजनी मंडळ, कोपरगांव.

**प्रजासत्ताक दिन**— दि. २६ जानेवारी १९८४ रोजी सकाळी ७–३० वा. संस्थानमध्ये माननीय रिसीव्हर श्री. क. हि. काकरे साहेब यांचे शुभहस्ते ध्वजवंदन कार्यक्रम झाला. गावातील प्रतिष्ठीत नागरीक, श्रीच्या दर्शनासाठी आलेले साईभक्त साईनाथ माध्यमिक विदयालयातील शिक्षक वर्ग, विदयार्थी, विदयार्थीनी, संस्थान कर्मचारी, सेवेकरी, बॅण्डपथक, होमगार्डस्, पोलीस उपस्थीत होते. कार्यक्रम उत्साहाने साजरा झाला. उपस्थींतांना चहापान दिल्यावर कार्यक्रम समाप्त झाला.

**सत्कार समारंभ**— सन १९८३ सालाकरीता उत्कृष्ट स्वच्छता– कामगारासाठी ठेवलेले सौ. सुशिलाबाई शंकरराव गोडखिंडी पारितोषीक (चांदीचे पदक,) श्री. अचवित तुकाराम माळी, कायम स्वच्छता कामगार, श्री. साईबाबा संस्थान शिर्डी यांना देण्यात आले.

तसेच सन १९८३ सालाकरीता साईनाथ रुग्णालयातील उत्कृष्ठ कामगारासाठी ठेवलेले श्री. अशोक शंकरराव गोडखिंडी पारितोषीक (चांदीचे पदक,) सौ. नलिनी विठ्ठल जगताप, कायम परिचारीका, साईनाथ रुग्णालय श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांना देण्यात आले.

**हवापाणी** — शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. पहाटे हवा थंड असते.

# साईबाबा संस्थान शिरडीची प्रकाशने

| अ. क्र. | पुस्तकाचे नाव | भाषा | किंमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | श्री साईचरित्र | मराठी | २२–०० | ६–०० |
| २) | ,, | इंग्रजी | १३–५० | ४–०० |
| ३) | ,, | हिंदी | १२–०० | ४–०० |
| ४) | ,, | गुजराथी | १२–०० | ४–०० |
| ५) | ,, | कन्नड | १०–०० | ४–०० |
| ६) | ,, | तेलगू | १३–०० | ४–०० |
| ७) | ,, | तामीळ | १२–०० | ४–६० |
| ८) | श्री साईलीलामृत | मराठी | ७–५० | ३–०० |
| ९) | ,, | हिंदी | ७–०० | ३–५० |
| १०) | ,, | गुजराथी | ४–२५ | ३–०० |
| ११) | अवतार व कार्य | मराठी | ४–०० | ३–०० |
| १२) | स्तवन मंजरी | मराठी | ०–३५ | ३–०० |
| १३) | ,, | गुजराथी | ०–३० | ३–०० |
| १४) | सगुणोपासना | मराठी | ०–५० | ३–०० |
| १५) | ,, | गुजराथी | ०–५० | ३–०० |
| १६) | तेलगू पुजाविधी | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| १७) | चार अध्याय | मराठी | १–२५ | ३–०० |
| १८) | श्रीसाईबाबा ऑफ शिरडी (भरुचा) | इंग्रजी | ५–०० | ३–०० |
| १९) | किर्तनमाला | मराठी | ०–७५ | ३–०० |
| २०) | सचित्र साईबाबा | मराठी | ४–०० | ३–०० |
| २१) | शिरडी दर्शन | इंग्रजी | ४–५० | ३–०० |
| २२) | मुलांचे साईबाबा | मराठी | १–७५ | ३–०० |
| २३) | ,, | इंग्रजी | १–७५ | ३–०० |
| २४) | ,, | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| २५) | ,, | गुजराथी | १–५० | ३–०० |
| २६) | ,, | हिंदी | १–७५ | ३–०० |

Regd. No. MH/BYE/26
LICENCE No. 19
Licence To Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14

(कव्हर पृष्ट ३ वरून)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २७) | ग्रेट सेंट श्री साईबाबा | मराठी | ०–५० | ३–०० |
| २८) | श्री साईबाबा दि सुपरमॅन | इंग्रजी | ५–२५ | ३–०० |
| २९) | शिरडी गाईड | इंग्रजी | १–५० | ३–०० |
| ३०) | ,, | मराठी | १–५० | ३–०० |
| ३१) | शिरडी गाईड | गुजराथी | १–५० | ३–०० |
| ३२) | ,, | हिंदी | छपाई चालु | आहे. |
| ३३) | रुद्राध्याय | मराठी | ०–९० | ३- ०० |

३४) श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र मराठी व इंग्रजी वार्षिक वर्गणी
१०–०० प्रत्येकी प्रत १–००
(व्ही. पी. ची पद्धत नाहीं)

| अ क्र. | फोटोचे नाव | फोटो साईज | किंमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | आशिर्वाद फोटो | १४"×२०' | १–६५ | ३–०० |
| २) | ,, | १०"×१४' | १–१० | ३–०० |
| ३) | ,, | ७"×१०' | ०–५५ | ३–०० |
| ४) | ,, | ४"×६" | ०–२० | ३–०० |
| ५) | ,, | २"×३" | ०–१५ | ३–०० |
| ६) | दगडावर बसलेले बाबा (रंगीत) | १४"×२०" | १–६५ | ३–०० |
| ७) | ,, (काळा पांढरा) | १४"×२०" | १–६५ | ३–०० |
| ८) | मूर्ती फोटो | १३"×१८" | २–७५ | ३–०० |
| ९) | ,, | १३"×१८" | १–०० | ३–०० |
| १०) | द्वारकामाई कॅमेरा (रंगीत फोटो) | १०"×२०" | १–१० | ३- ०० |
| ११) | ,, (काळा पांढरा) | १०'×१४" | ०–८५ | ३–०० |
| १२) | कॅमेरा द्वारकामाई फोटो , | ९'×१२' | १–१० | ३–०० |
| १३) | ,, (रंगीत) | ९"×१२' | १–६५ | ३–०० |
| १४) | निळा | ९×१३ | ०–७५ | ३–०० |
| १५) | श्रीसाईबाबांचे पत्र्याचे कॅलेंडर | — — — | १६–०० | ८–०० |

मुद्रक : पांडुरंग मोरे, बॉम्बे नॅशनल प्रिन्टर्स प्रा. लि. ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ३१, संपादक व प्रकाशक : श्री. क. हि. काकरे, साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४, बी. दादर मुंबई१४.

COVER PRINTED AT TYPOGRPHIC BOMBAY